cmyk

## संपादकीय

### सर्वच देशांची जबाबदारी, नसता गंभीर परिणाम

हवामान बदल वा 'ग्लोबल वॉर्मिंग' या विषयावर मागच्या अनेक वर्षांपासून जगभर विचारमंथन होत आहे. हवामान बदलाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निसर्ग, मानवी जीवन व एकूणच जीवसृष्टीवर होणाऱ्या परिणामांचा सातत्याने अभ्यास होत आहे. याशिवाय जगभरातील हवामानशास्त्रज्ञ, संशोधक क्लायमेट चेंज तसेच गंभीर परिणामांवर बोलत असतात. तथापि, आंतरराष्ट्रीय न्यायालयाने त्यावर बोलणे आणि थेट हवामान बदल हा मानवाच्या अस्तित्वासाठी धोका असल्याचे सांगणे, यातून याविषयाची दाहकता लक्षात यावी.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–९३ | सोमवार, दि.२८ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### देशभरात मुसळधार पावसाचा इशारा

नवी दिल्ली/पुणे : हवामान खात्याने रविवारी देशभरात अलर्ट जारी केला असून पुढील ३ दिवस देशातील काही राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. पूर्व राजस्थान, पश्चिम मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला असून त्याच वेळी, उत्तराखंड, पूर्व मध्य प्रदेश, सौराष्ट्र–कच्छ, मध्य महाराष्ट्र, कोकण–गोवा, कर्नाटक, केरळ, आसाम, मेघालय, सिक्कीम, अरुणाचल प्रदेशाला अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. शनिवारी, रुद्रप्रयागमध्ये रात्रभर झालेल्या पावसामुळे १६०० हून अधिक चारधाम यात्रेकरूंना बाहेर काढण्यात आले. पावसामुळे डोंगरावरून मोठे दगड पडले आणि गौरीकुंडजवळील केदारनाथकडे जाणारा रस्ता बंद झाला. ७०० यात्रेकरूंना बाहेर काढण्याची प्रक्रिया अजूनही सुरू आहे.

## थोडक्यात...

### कारगिल युद्धाचा थरार आता प्रत्यक्ष पाहता येणार

मुंबईः कारगिल युद्धात भारतीय सैनिकांनी ज्या त्वेषाने आणि दुर्दम्य इच्छाशक्तीने शत्रूशी लढा दिला, त्या लढाईचा थरार आता इथे भेट देणाऱ्या प्रत्येक भारतीय पर्यटकाला प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे. जून महिन्यात भारतीय लष्कर आणि सरहद संस्थेच्या संयुक्त विद्यमाने कारगिल युध्द विजय रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सरहद शौर्यथॉन–२०२५ (मॅरेथॉन) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने द्रास युद्ध स्मारकाला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी रूपये ३ कोटी खर्च करून 'लाईट ॲण्ड साऊंड शो' सुरु करण्यात येईल अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. याच लाईट अँड साऊंड शोची निर्मिती आता भारतीय लष्कराने सुरू केली आहे. त्यामुळे लवकरच कारगिल युद्धाचा थरार आता प्रत्यक्ष पाहता येणार आहे.

### लातूर जिल्ह्यात बारा गावांत 'लम्पी'चा प्रादुर्भाव

लातूरः जिल्ह्यात गोवर्गीय पशुधनात लम्पी स्किन प्रादुर्भाव आढळून आला असून आतापर्यंत चार तालुक्यातील बारा गावांमध्ये ४७ बाधित गोवर्गीय जनावरांची नोंद झाली आहे. जिल्हा प्रशासन व पशुसंवर्धन विभागाने तातडीने हालचाली करुन शीघ्र कृती दलाची स्थापना केली आहे. जिल्ह्यातील सर्व १३२ पशू चिकित्सालये व तीन फिरते पशू चिकित्सालय आदी पशुवैद्यकीय संस्थांना शासनाच्या मानक कार्यपद्धतीनुसार विलगीकरण, औषधोपचार, बाह्यपरोपजीवी नियंत्रण आणि डिसइन्फेक्शनबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्याची माहिती जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी दिली.

### बोगस राजदूत हर्षवर्धन जैनचा पर्दाफाश

नवी दिल्ली : राजदूताच्या साजेशीर वेषात जगभर फिरत, परदेशी गुंतवणूक, नोकऱ्या व बिझनेस डीलचे आमिष दाखवून शेकडो लोकांची फसवणूक करणाऱ्या हर्षवर्धन जैन या व्यक्तीचा गूढपणाने भरलेला आर्थिक घोटाळा उघडकीस आला आहे. उत्तर प्रदेशच्या विशेष दलाने हर्षवर्धन जैन याला अटक केली असून, सध्या त्याच्या घोटाळ्याच्या चौकशीचा व्याप वाढताना दिसून येत आहे. हर्षवर्धन जैन (वय ४७) याने २००५ ते २०१५ या कालावधीत तब्बल १६२ वेळा परदेशात प्रवास केला. त्यात युएईमध्ये ५४ वेळा आणि यूकेमध्ये २२ वेळा प्रवास केला गेला. या प्रवासांच्या आडून त्याने अनेक बोगस व्यवहार आणि आर्थिक फसवणूक केली असल्याचे समोर आले आहे.

### सात मुलांच्या मृत्यूनंतर शिक्षकांविरुद्ध एफआयआर

जयपूरः राजस्थानमधील झालावाड जिल्ह्यातील पिपलोडी गावात झालेल्या दुःखद शाळेच्या दुर्घटनेनंतर, गावकरी आणि मृत मुलांच्या कुटुंबियांच्या तक्रारीवरून मुख्याध्यापक आणि चार शिक्षकांविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दुर्घटनेत सरकारी उच्च प्राथमिक शाळेत वर्गाची भिंत आणि छत कोसळल्याने सात मुलांचा मृत्यू झाला आणि २१ जण जखमी झाले. या घटनेने संपूर्ण राज्य हादरले. झालावाड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अद्याप एफआयआरमध्ये कोणाचेही नाव स्पष्टपणे लिहिलेले नाही. पण तपास सुरू आहे, त्यामुळे कोणालाही ताब्यात घेतले गेलेले नाही. हा गुन्हा डांगीपुरा पोलिस ठाण्यात नोंदवण्यात आला आहे.

### गुगल मॅपमुळे भरकटलेली कार थेट बेलापूरच्या खाडीत

बेलापूरः इच्छितस्थळी जाण्यासाठी गुगल मॅपच्या वापरामुळे देशभरात वाहनांचे अपघात वाढले आहेत. असाच एक अपघात नवी मुंबईतील बेलापूर येथे घडला. मॅपनुसार कार बेलापूर येथील पुलावरून न जाता पुलाखालून गेली आणि कार थेट खाडीत जाऊन कोसळली. कारसह चालक महिला खाडीत वाहून जात असताना हा प्रकार सागरी पोलिसांच्या लक्षात आला आणि ते मदतीला धावून गेले. त्यामुळे या महिलेचा प्राण वाचू शकला. महिला कारचालक उलवेच्या दिशेने जात होती. गुगल मॅपवर सरळ रस्ता दाखवला गेल्याने तिने पुलावरून न जाता, खालील पर्यायी मार्ग निवडला. मात्र, तो मार्ग थेट ध्रुवतारा जेट्टीकडे जातो. मात्र हे तिच्या लक्षात आले नाही आणि कार अनपेक्षितपणे थेट खाडीत कोसळली.

# मराठवाड्यातील शेतकऱ्यांमध्ये पीकविम्याबाबत निरूत्साह

## केवळ १२ लाख ७७ हजार हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मराठवाड्यातील पेरणी केलेल्या एकूण ४६ लाख ८३ हजार ५८७ हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे १२ लाख ७७ हजार ९८९ हेक्टर क्षेत्रच विमा संरक्षित करण्याला शेतकऱ्यांनी पसंती दिली आहे.**

नव्या नियमानुसार पीक कापणी प्रयोगातील उत्पादनानुसार शेतकऱ्यांना पीकविमा संरक्षित परतावा मिळणार आहे. आधीच्या पीकविमा पद्धतीतील बदलांमुळे



शेतकऱ्यांचा आपल्या पिकांना विमा

**जिल्हानिहाय पीकविमा संरक्षित क्षेत्र (हेक्टरमध्ये)**

छत्रपती संभाजीनगर – १,३४,९५४.१८. जालना १,१६,००३.४. बीड २,२२,३२५.१३. लातूर १,९४,३३८.४५. धाराशिव १,५३,४००.०६. नांदेड २,२२,४८१.६६. परभणी १,६६,३७४.६९. हिंगोली ६८,११२.३७.

संरक्षण घेण्याकडे कल कमी दिसतो आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मराठवाड्यात सर्वसाधारण ४९ लाख ७२ हजार ७२८ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत सुमारे ४६ लाख ८३ हजार ५८७ हेक्टरवर खरिपाची पेरणी झाली. पेरणी झालेल्या या क्षेत्रापैकी छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड या तीन जिल्ह्यांतील १२ लाख २३ हजार ४६८ शेतकऱ्यांनी ९ लाख ९९ हजार ४५१ अर्जाद्वारे सुमारे ४ लाख ७३ हजार २८२.७१ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. दुसरीकडे लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी ▶▶ पान २ वर

**राज्यभरातील शेतकऱ्यांत उदासीनता**

राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी यंदा पीक विम्याकडे पाठ फिरवली आहे. कारण शासनाच्या नव्या अटी आणि शर्ती. मागील वर्षी तब्बल ७६ लाख शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविलेला असताना, यंदा फक्त २७ टक्के शेतकरीच अर्ज भरत आहेत. पीक विम्यासाठी केवळ ४ दिवस शिल्लक असूनही, ७३ टक्के शेतकरी अद्याप विम्याच्या कवचाबाहेर आहेत. अटी कठीण, भरपाई निश्चित नाही आणि हप्ता स्वतः भरा या बदलांनी शेतकऱ्यांमध्ये मोठी नाराजी पसरली आहे. २०२४ च्या खरीप हंगामात राज्यातील ७६ लाख ३१ हजार ५२७ शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभाग घेतला होता. मात्र, यंदा आतापर्यंत केवळ ४५ लाख २८ हजार ३२२ शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यांनी एकूण २८ लाख १९ हजार ३३२ हेक्टर क्षेत्राचे विमा संरक्षण घेतले आहे.

# संघर्ष आपल्या रक्तात; तो शेवटपर्यंत करणार–धनंजय मुंडे

**ठाणे । प्रतिनिधी**

मी राजकारणात आणि सामाजिक जीवनात सक्रिय झाल्यापासून आजपर्यंत माझ्यावर अनेक संकटे, अनेक संघर्ष आले, त्यांना मी सामोरे गेलो. मात्र यावेळी सलग २०० दिवस माझी मीडिया ट्रायल चालवली गेली. मी, माझे आई – वडील, माझी मुले – बाळे, माझी जात, माझा जिल्हा, माझी माती या सगळ्यांची बदनामी केली गेली. त्या सर्व बदनामीला मी संयमाने तोंड दिले. जात म्हणून अनेकांनी सातत्याने द्वेष भावनेने टीका टिप्पणी, आरोप केले. कुणी व्यक्ती दोषी



असेल तर त्याला जरूर फाशी द्या, चुकीचे समर्थन कुणीच करणार नाही; समाज म्हणून तरीही आमचा जो द्वेष केला त्याला मात्र आम्ही द्वेषाने उत्तर देणार नाही. आम्हाला स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब, स्व. पंडित अण्णा मुंडे यांनी सर्वसमावेशक कार्याची शिकवण दिलेली आहे. उलट आज जे जात म्हणून द्वेष करत आहेत, उद्या त्यांनीच आपल्याला सन्मानाची भावना व्यक्त करावी, असे काम एकत्रितपणे करून दाखवू, असं प्रतिपादन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी ठाणे येथील कार्यक्रमात बोलताना केले आहे.

ठाणे शहरातील टीप टॉप प्लाझा येथे सकल वंजारी समाजाच्या वतीने वंजारी समाज अधिवेशन व विचार मंथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते; या प्रसंगी श्री. मुंडे बोलत होते. यावेळी मागील २०० दिवस कोणत्याही गोष्टीवर व्यक्त न झालेल्या धनंजय मुंडे यांनी आज आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. मी स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांचा संघर्ष अगदी जवळून पाहिला व अनुभवला आहे. ▶▶ पान २ वर

# मुले स्पेस सायंटिस्ट बनू इच्छितात!

## 'मन की बात' मधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संदेश

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज 'मन की बात' या रेडिओ कार्यक्रमाच्या १२४ व्या भागात देशाला संबोधित केले. एपिसोडच्या सुरुवातीला त्यांनी शुभांशू शुक्ला आणि अंतराळाबद्दल सांगितले. ते म्हणाले अंतराळवीर शुभांशू शुक्ला पृथ्वीवर उतरताच लोकांनी आनंदाने उड्या मारल्या. पंतप्रधान पुढे म्हणाले



यामुळे मुलांमध्ये विज्ञान आणि अंतराळाबद्दल ▶▶ पान २ वर

# अल्पवयीन मुलीच्या तोंडावर स्प्रे मारुन अपहरण

**शिरूर । प्रतिनिधी**

**तालुक्यातील वडाळी गावात एका अल्पवयीन मुलीचं अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अज्ञात व्यक्तींनी मुलीच्या तोंडावर स्प्रे मारला. तिला जवळच्या शेतात नेऊन हातपाय बांधून तिला झाडा–झुडपांत टाकलं. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.**

शनिवारी दुपारी वडाळीतील एका १७ वर्षांच्या मुलीच्या अपहरणाची माहिती समोर आली. मुलगी घराच्या मागे उभी होती. तेव्हा दोन अज्ञात लोक आले. त्यांनी तिच्या तोंडावर स्प्रे मारला. तोंडावर स्प्रे मारल्यामुळे मुलगी बेशुद्ध झाली. मुलगी बेशुद्ध झाल्यानंतर स्प्रे मारलेल्या दोघांनी मुलीला ओढत शेतात नेलं. शेतात नेत तिचे हातपाय दोरीने बांधले.मुलगी बराच ▶▶ पान २ वर

# मंत्री पदाची खदखद; प्रकाश दादांनी ओढाउन घेतला दोन्ही पवारांचा रोष



**बीड । प्रतिनिधी**

**राजकारणामध्ये खुर्ची पद मंत्री राज्यमंत्री याबाबत अपेक्षा ठेवणे काही गैर नाही मात्र ते पद मिळवण्याची मनात मोठी इच्छा ठेवून इतर समाजाला टार्गेट करणे कितपत योग्य आहे प्रकाश दादांनी थेट मंत्री पदासाठी हा बीड जिल्हा ओबीसी राखीव असल्याचे बोलतानाच शरद पवार अजित पवार यांनी गेल्या पस्तीस वर्षात कधी विश्वासात घेतले नाही यावेळी विश्वासात घेतले नाही तर माझा निर्णय कळवणार असल्याचा थेट इशारा त्यांनी पक्षश्रेष्ठीला एक प्रकारे दिला आहे.**

काल माध्यमाशी बोलताना माजलगाव मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित दादा पवार गटाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी आपल्या मनातील मंत्रिपदाची खदखद बोलून व्यक्त केली त्यांच्या वक्तव्यानंतर अनेकांनी हा दादाचा दोष नाही तर वयाचा दोष आहे डोक्यातील जात जात का नाही असे प्रश्न अनेकांनी उपस्थित केले बीड जिल्हा मंत्री पदासाठी ओबीसीला राखीव असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले शरद पवार ▶▶ पान २ वर

### मानसादेवी मंदिरात चेंगराचेंगरी; ६ ठार

**उत्तराखंड । वृत्तसंस्था**

संपूर्ण देशात चारधाम यात्रेमुळे प्रसिद्ध झालेल्या हरिद्वारमधील मंदिरात चेंगराचेंगरीची दुर्घटना घडली आहे. शहरातील मानसादेवी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत ६ जण ठार झाले आहेत तर अनेक भाविक जखमी झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. कोतवाली प्रभारी रितेश शाह यांनी मानसा देवी मंदिरातील चेंगराचेंगरीच्या घटनेची पुष्टी केली आहे. दुर्घटनेनंतर पोलिस आणि प्रशासनाचे पथक घटनास्थळी पोहोचले आहे. गढवालचे आयुक्त विनय शंकर पांडे यांनी दिलेल्या माहितीनुसार दुर्घटनेत ३५ जण जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढू शकतो. जखमींना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# अनैतिक संबंधाच्या संशयावरुन महाराजाचा खून

## दोघांना ३ दिवसाची पोलीस कोठडी

**जालना । प्रतिनिधी**

**वाटुरफाटा – मंठा रोडवर केंधळी येथे अनैतिक संबंधाचा संशय घेवुन लाठ्या–काठ्याने मारहाण करीत एका महाराजाचा खून केल्याप्रकरणी साला आणि मेव्हाण्याला घटनेनंतर काही वेळातच अटक करण्यात आली. याप्रकरणी दोघा आरोपींना न्यायालयामध्ये हजर केले असता, न्यायालयाने दोघा आरोपींना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती यांनी दिली.**

यासंदर्भात पोलीस सुत्रांनी दिलेली अधिक माहिती अशी की, केंधळी शिवारातील एका सिमेंट फॅक्टरीत निवृत्ती विनायक सवडे आणि गणेश समाधान अंभोरे हे कामाला असून, ते परिवारासह याच फॅक्टरीत राहतात. तर फॅक्टरीपासून थोड्या अंतरावर अवधुत महाराज एकटेच राहत होते. दरम्यान, रविवारी पहाटे अवधुत महाराज हे जखमी अवस्थेत सिमेंट फॅक्टरीसमोर पडल्याचे भगवान गडदे यांना आढळून आले असता, उपचारार्थ त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना तपासून मयत घोषीत केले. महाराजांच्या अंगावर गंभीर मारहाणीचे व्रण ▶▶ पान २ वर

# युतीच्या दिशेने आणखी एक पाऊल !

## तब्बल १८ वर्षांनी राज ठाकरे मातोश्रीवर, उद्धव ठाकरेंना दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याच्या राजकारणात भूकंपाचे धक्के देणारी एक मोठी घडामोड रविवारी घडली आहे. तब्बल १८ वर्षांच्या प्रदीर्घ दुराव्यानंतर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची पावले अखेर मातोश्री या ठाकरे कुटुंबाच्या निवासस्थानाकडे वळली. आपले चुलत भाऊ आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी राज ठाकरे मातोश्रीवर दाखल झाले. या भेटीमुळे केवळ ठाकरे कुटुंबातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.**



रविवारी सकाळपासूनच उद्धव ठाकरेंना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी कार्यकर्त्यांची रीघ लागली होती. त्यातच दुपारी १२ नंतर राज ठाकरेंचे मातोश्रीवर आगमन झाले. यावेळी खा. संजय राऊत हे राज यांना उद्धव यांच्यापर्यंत घेऊन आले. ▶▶ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ जुलै २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २१.०० क्विंटल | २,४५१ | २,७२८ | २,५६८ |
| ज्वारी/हायब्रिड: ९३.५० क्विंटल | १,९५० | ३,०७० | २,४९३ |
| मका/लोकल:१२.५० क्विंटल | २,०२० | २,२८० | २,१५० |
| तूर : २५.५० क्विंटल | ६,३०० | ६,५०० | ६,४२६ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ७१.५० क्विंटल | २,११० | २,८५८ | २,६३४ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: २५.०० क्विंटल | ३,९०० | ३,९०० | ३,९०० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ४,६०० | ५,१११ | ४,८५५ |

# पुण्यात खडसे यांचे जावई रेव्ह पार्टीत सापडले

**पुणे । प्रतिनिधी**

**उच्चभ्रू खराडी भागातील एका फ्लॅटमध्ये हाऊस पार्टीच्या नावाखाली रेव्ह पार्टी सुरू होती. या रेव्ह पार्टीवर पोलिसांनी छापेमारी केल्याची माहिती समोर आली आहे. रेव्ह पार्टी करणा–यांमध्ये २ महिला आणि ४ पुरुषांचा समावेश आहे. धक्कादायक म्हणजे यामध्ये एकनाथ खडसे यांचे जावई व रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर देखील असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी छापेमारी करत प्रांजल खेवलकर यांनाही ताब्यात घेतले आहे. या छापेमारीत पुणे पोलिसांनी अमली पदार्थ, हुक्का, दारू जप्त केली असल्याची माहिती मिळत आहे.**



पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेला या पार्टीबाबतची गुप्त माहिती मिळताच पोलिसांनी पार्टीच्या ठिकाणी धाड टाकून अचानक तिथे उपस्थित असलेल्या संशयितांना ताब्यात घेतले. या रेव्ह पार्टीत सहभागी असलेल्या ६ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे, यामध्ये २ महिला आणि ४ पुरुषांचा समावेश आहे. या रेव्ह पार्टीत एकनाथ खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर यांचा समावेश आहे अशी माहिती समोर आली आहे.दरम्यान जावई रंगेहाथ सापडताच एकनाथ खडसे यांनी एका वृत्तवाहिनीसोबत बोलताना पहिली प्रतिक्रिया दिली. एकनाथ खडसेंना जावयाच्या संदर्भात विचारणा केली असता एकनाथ खडसे म्हणाले की, ▶▶ पान २ वर

**राजकीय षडयंत्र–खडसे**

गेल्या काही दिवसांपासून एकनाथ खडसे सरकारच्या विरोधात भूमिका घेत आहेत. भाजपचे नेते आणि मंत्री गिरीश महाजन व एकनाथ खडसे या दोघांच्या एकमेकांवर आरोपांच्या फैरी सुरू आहेत. रेव्ह पार्टी प्रकरणावर बोलताना खडसे म्हणाले, यात मी कोणाच्याही बाजूला राहणार नाही. यामध्ये षडयंत्र असल्यास समोर आले पाहिजे.

cmyk

## अग्रलेख

# सर्वच देशांची जबाबदारी, नसता गंभीर परिणाम

हवामान बदल वा 'ग्लोबल वॉर्मिंग' या विषयावर मागच्या अनेक वर्षांपासून जगभर विचारमंथन होत आहे. हवामान बदलाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निसर्ग, मानवी जीवन व एकूणच जीवसृष्टीवर होणाऱ्या परिणामांचा सातत्याने अभ्यास होत आहे. याशिवाय जगभरातील हवामानशास्त्रज्ञ, संशोधक क्लायमेट चेंज तसेच गंभीर परिणामांवर बोलत असतात. तथापि, आंतरराष्ट्रीय न्यायालयाने त्यावर बोलणे आणि थेट हवामान बदल हा मानवाच्या अस्तित्वासाठी धोका असल्याचे सांगणे, यातून याविषयाची दाहकता लक्षात यावी. आंतरराष्ट्रीय न्यायालय ही जगातील महत्त्वाची न्यायिक संस्था. देशोदेशीचे न्यायनिवाडे या न्यायसंस्थेत येतात. अशी संस्था थेट हवामान बदलाबाबत धोक्याचा इशारा देत असेल, तर त्यातील गांभीर्य समजून घेतले पाहिजे. आत्तापर्यंतचा इतिहास पाहिला, तर न्यायालयाने प्रथमच यावर भाष्य केल्याचे दिसून येते. मुख्य म्हणजे यासंदर्भात मतप्रदर्शन करत असताना १५ न्यायाधीशांचे याबाबत एकमत झाल्याचे पहायला मिळते. यातूनच काय ते लक्षात यावे. यात न्यायाधीश इवासावा युजी यांनी मांडलेली भूमिका अनेकार्थांनी महत्त्वाची होय. संपूर्ण पृथ्वीसाठी हवामान बदल हा विषय गंभीर आहे. यातून सर्व प्रकारच्या जीवसृष्टीला धोका पोहोचू शकतो. म्हणून याबाबतच्या निष्कर्षातून हवामान आपत्तीवर सामाजिक व राजकीय पातळीवर कायद्याद्वारे ठोस उपाययोजना करता येईल, असे त्यांनी म्हटले आहे. ते रास्तच आहे.

सजीवसृष्टीला निसर्गाचे भरभरून दान मिळाले आहे. निसर्ग, पर्यावरण यातून या जीवसृष्टीचे भरणपोषण होते. कष्ट, जिद्द आणि बुद्धिमत्तेच्या बळावर मानवाने आजवर क्रांतिकारक विकास साधला आहे. परंतु, मानवाच्या या विकासात निसर्गानेही मोलाची भूमिका बजावली आहे, हे विसरता येत नाही. खरे तर मानवाच्या उत्पत्तीपासून पर्यावरण आणि विकास यांचा समांतर पद्धतीनेच प्रवास होत आला आहे. मात्र, औद्योगिक क्रांतीनंतर खऱ्या अर्थाने यामध्ये अडथळे आलेले दिसतात. अतिविकासाच्या हव्यासामध्ये मानवाकडून निसर्गावर, पर्यावरणावर मोठ्या प्रमाणात आक्रमण होऊ लागले. अतिनागरीकरणाच्या झपाट्यात डोंगर फोडले जाऊ लागले, नद्या वळवण्यात आल्या, नैसर्गिक प्रवाह संकुचित करण्यात आले. याशिवाय जल, हवा, पाणी, कचरा यांसह सर्व प्रकारच्या प्रदूषणाला मानव जातीकडून हातभार लावण्यात आला. या साऱ्याचा अतिरेक झाल्यानंतरच खऱ्या अर्थाने ग्लोबल वॉर्मिंग किंवा हवामान बदलाची समस्या निर्माण झाली आहे, हे कुणी नाकारणार नाही. निसर्गाचे म्हणून एक चक्र राहिलेले आहे. त्यात काही प्रमाणात चढ उतार असणे, हेही नैसर्गिकच होय. परंतु, मागच्या काही वर्षांतील हवामानाचा आलेख तपासला, तर त्यात मोठे बदल दिसतात. ढगफुटी, अतिवृष्टी, उष्णतेच्या वा थंडीच्या लाटा, प्रचंड हिमवृष्टी, हिमनद्या वितळणे, अवर्षण हे सारे हवामान बदलाचेच प्रकार म्हणता येतील. भारत, अमेरिका, जपानसह यूरोपातील अनेक देशांना या सगळ्या आपत्तीतून जावे लागत आहे. बिघडलेल्या या पर्यावरणावर जागतिक स्तरावर ऊहापोह होत आहे. हवामान परिषद हा त्याचा वैश्विक मंच. परंतु, या मंचावर हवामान हा विषय किती गांभीर्याने घेतला जातो, असा प्रश्न पडतो. खरेतर फ्रान्सच्या राजधानीतील पॅरिस हवामान परिषदेत यावर सर्वंकष चर्चा झाली होती. १० वर्षांपूर्वी झालेल्या या परिषदेत जागतिक तापमानवाढ रोखण्यासाठी सर्व देशांमध्ये सहमती घडवण्यासाठी व्यापक करारही करण्यात आला. तापमानवाढ २ अंश सेल्सिअसपेक्षा कमी किंवा दीड अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न करणे, प्रत्येक देशाने उद्योग, ऊर्जा, वाहतूक आदी क्षेत्रांतून होणारे हरित वायूंचे उत्सर्जन कमी करण्यासाठी उद्दिष्ट निश्चित करणे, याचा यात समावेश होता. विकसनशील देशांना हवामान बदलाशी सामना करण्यासाठी विकसित देशांनी आर्थिक मदत करण्याचा मुद्दाही यामध्ये समाविष्ट होता. परंतु, अमेरिकेसारख्या विकसित देशाची यासंदर्भातील भूमिका ही धरसोडीची व एककल्लीच राहिल्याचे दिसले. मुळात हवामान हा संवेदनशील विषय आहे. तो त्याच संवेदनशील पद्धतीने हाताळला पाहिजे. यासंदर्भात विकसित देशांना एक नियम, विकसनशील देशांना दुसरा नियम असे करून चालणार नाही. सर्वच देशांनी हवामानविषयक नियम पाळले पाहिजेत. त्याचबरोबर हवामानाच्या पातळीवर भरीव काही करायचे असेल, तर विकसित देशांनी हात आखडता न घेता विकसनशील देशांना मदत करायला हवी. हवामान उद्दिष्टे ही इच्छेवर अवलंबून नसून, त्यावर कायदेशीर बंधने लागू होतात. त्यामुळे हवामान कृतीसंदर्भात देशांची जबाबदारीपासून सुटका होऊ शकत नाही, असेही जागतिक न्यायालयाने म्हटले आहे. म्हणूनच पॅरिस कराराशी सुसंगत भूमिका व ध्येय निश्चित करणे व त्याप्रमाणे आचरण करणे, हे प्रत्येक देशाचे कर्तव्य आहे. नव्हे, सर्वच देशांची ही कायदेशीर जबाबदारी आहे. याची प्रत्यक्ष परतफेड करणे शक्य नसेल, तर जबाबदार देशांनी हवामानामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करणे गरजेचे असल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे. त्यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही.

# मराठा सेवा संघाच्या वधू वर कक्षाने परिचय मेळाव्यांची व्याप्ती वाढवावी–आ. सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

**समाजामध्ये विवाह जुळवणे अत्यंत अवघड काम झाले आहे. मध्यस्तांची संख्या कमी झाली. नात्यागोत्यामध्ये आपसात संवाद राहिला नाही. म्हणून वधू वर परिचय मेळाव्यांची गरज भासू लागली आहे. मराठा सेवा संघाने आशा वधू वर मेळाव्यांची व्याप्ती वाढवावी असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले. आष्टी येथे आयोजित मराठा वधू वर व परिचय मेळाव्याचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते.**

मराठा समाजातील लोक विवाह समारंभावर प्रचंड खर्च करतात. हा खर्च कमी झाला पाहिजे. यासाठी सुद्धा मराठा सेवा संघाने पुढाकार घ्यावा .मध्यंतरीच्या काळामध्ये स्त्रीभ्रूणहत्या मोठ्या प्रमाणावर झाली. त्यामुळे मुलींची संख्या कमी झाली. त्याचा दुष्परिणाम आज समाज भोगत आहे. तरीसुद्धा उच्चशिक्षित मुलींची संख्या उच्चशिक्षित मुलांपेक्षा जास्त झाली आहे. त्यामुळे शेतकरी मुलांना मुली मिळत नाहीत .पण आता शेती विकणारांची संख्या कमी झाली. आणि युवक शेती करणे पसंत करू लागले आहेत. तांत्रिक पद्धतीने शेती करणाऱ्यांची संख्या वाढू लागली आहे. शेतीमध्ये नोकरीपेक्षा जास्त उत्पन्न मिळू लागले आहे. म्हणून शेतकऱ्यांना चांगले दिवस येणार आहेत असेही ते म्हणाले. आपल्या प्रास्ताविकपर भाषणामध्ये इंजि.तानाजी जंजिरे म्हणाले की मराठा समाजाच्या विवाह विषयक अडचणी सोडवता याव्यात म्हणून सदरचा मेळावा आम्ही आयोजित केला आहे. यापुढे लवकरच अंबाजोगाई, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, पुणे ,शिर्डी आदी ठिकाणी मराठा समाजाची मोठे आणि भव्य असे मेळावे आयोजित करण्यात येणार आहेत.आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये वृद्धेश्वर साखर कारखान्याचे कार्यकारी सल्लागार जे. आर .पवार साहेब म्हणाले की, मुला-मुलींचे लग्न वेळेवर होत नसल्यामुळे समाजावर मोठे संकट येऊ घातले आहे. आपला मराठा समाजच अल्पसंख्याक समाज होण्याच्या मार्गावर आहे. पुढे ते म्हणाले की काळाची गरज ओळखून आंतरजातीय विवाह करणे सुद्धा गरजेचे आहे. यावेळी मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष अशोकजी ठाकरे, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई माने, विभागीय उपाध्यक्ष सुवर्णाताई गिरे, बीड जिल्हाध्यक्ष संगीताताई शिंदे, प्राचार्य शशिकांत कनेरे, शिवाजी पाचे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन दिनेश पोकळे व प्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे यांनी केले. परिचय मेळाव्यामध्ये १०४ मुला-मुलींनी त्यांच्या पालकासह सहभाग नोंदवला. परिचय मेळाव्याचे सूत्रसंचालन डॉ. अशोक उढाने ,चेअरमन शिरीषभाऊ थोरवे व ज्येष्ठ पत्रकार ॲड.सीताराम पोकळे यांनी केले .मेळावा यशस्वी करण्यासाठी शिवश्री लक्ष्मण रेडेकर शिवश्री, भास्कर निंबाळकर, शिवश्री सुरेश पवार, ॲड .संजय जगताप, शिवश्री दीपक पोकळे, शिवमती संगीता पोकळे , शिवश्री बन्सीधर मोरे.विशाल खंडागळे, प्रा. डॉ.दत्ता नरसाळे, ऋषिकेश खंडागळे शिवश्री दीपक पोकळे, शिवमती जयश्री पोकळे आदींनी परिश्रम घेतले.

# आगामी निवडणुकींसाठी कार्यकर्त्यांनी ताकदीने तयारीला लागा–तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे



**जालना । प्रतिनिधी**

**शिवसेना पक्षाच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यभर "सक्रिय सदस्य नोंदणी अभियान" जोरात सुरू असून, मंठा येथे देखील या उपक्रमास मोठा प्रतिसाद मिळत आहे. या अभियानांतर्गत शिवसेनेचे विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचा आणि संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.**

जिल्हाप्रमुख ए.जे.पाटील बोराडे, बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे,तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना संपर्क कार्यालय येथे रविवार (दि.२७रोजी) सक्रीय सदस्यांची नोंदणी करण्यात आली. एका दिवसात जवळपास पाचशेच्या वर सदस्यांची नोंदणी करण्यात आली.या वेळी बोलताना तालुका प्रमुख बोराडे म्हणाले, "शिवसेना हा सामान्य जनतेचा पक्ष आहे. हे अभियान म्हणजे केवळ नोंदणी नव्हे, तर शिवसेनेची विचारधारा जनतेपर्यंत नेण्याचे महत्त्वाचे पाऊल आहे. यावेळी उपतालुकाप्रमुख रामराव वरकड, बाळासाहेब देशमुख, अक्षयदीप वाघमारे, विलासराव राठोड, शहर प्रमुख पांडुरंग बोराडे, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कासाबाई शिरगुळे, अमोल विरकर दत्तात्रय बोराडे राजेश खरात दीपक गायकवाड शुभम गुंड अजय गायकवाड सचिन गायकवाड अजय खंदारे नंदू मामा जाधव महेश देशमुख पंकज देशमुख परमेश्वर वरकड संतोष देवकर माऊली वायाळ संगीता खराबे सविता गवळी मीरा सरकटे भगवान बोराडे बाळासाहेब घोरसड समाधान शेवाळे सुनील गुंड विनोद प्रधान जयदेव चव्हाण शरद काकडे पिराजी पवळे विलास बनसोडे सुनील चव्हाण लिंबाजी बोराडे चांदभाई पठाण शंकर जाधव प्रल्हाद सांगळे शंकर राठोड फिरोज पठाण विष्णू मोरे महेश विधाते आकाश विधाते ऋषी बोराडे

# शासनाकडून पैसे मिळत नसल्याचे कंत्राटदार संघटनेचे निवेदन

**आष्टी । प्रतिनिधी**

**सांगली जिल्ह्यातील एका जलजिवनच कंत्राटदाराने शासनाचा निधी वेळेवर मिळत नसल्यच्या कारणावरून आत्महत्या केली होती अशीच काहीशी परस्थिती आष्टी तालुक्यातील कंत्राटदारांची झाली असून शासनाकडील थंकीत देयके देण्यात यावी या मागणीसाठी संघटनेचे वतीने निवेदन तहसिलदार यांना देण्यात आले आहे.**

शासनाने कान्ट्रक्टरांचे थकीत बीले तात्काळ द्यावेत अशा मागणीचे निवेदन अखिल भारतीय कान्ट्रक्टर असोसिएशनचे बीड जिल्हा सचिव इंजि. बाळासाहेब भुकन यांनी आष्टीच्या तहसिलदारांना दिले आहे. आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघामध्ये रस्ते व इमारती व जिल्हा नियोजन यांचे सर्वांचे मिळून १३० कोटी रु, जिल्हा परिषद पर्यटन तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत ३५ कोटी रु तर जलजीवन मिशनचे कोट्यावधी रुपये ठेकेदारांचे थकीत आहेत या भागातीलही ठेकेदार नैराश्यात गेलेले आहेत. अघटीत प्रकार होण्यापुर्वी ठेकेदारांचे थकीत बीले शासनाने द्यावेत अशी मागणी असोशिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. राज्य सरकारकडून केलेल्या कामाचा मोबदलाच वेळेत मिळाला नसल्याने त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. राज्यात लाडकी बहीण योजनेच्या अंम लबजावणीसाठी लागणारा निधीच्या तरतुदीम ळे राज्य सरकारवर दबाव येत असल्याची चर्चा असतानाच इतर विभागांचा तसेच इतर योजनांचासुद्धा निधी वळवण्यात आल्याचा आरोप सातत्याने होत आहे. या आरोपांची मालिका सुरू असतानाच सांगलीमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. जलजीवन मिशनचे काम करणाऱ्या सरकारी सरकारकडुन केलेल्या कामांचे कंत्राटदराने आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली आहे. हर्षल पाटील असं त्यांचं नाव असून राज्य सरकारकडून वेळेत बिलं मिळत नसल्याने नैराश्यातून टोकाचे पाऊल उचलले असल्याचा आरोप सरकारी कंत्राटदारांकडुन संघटनेकडून करण्यात आला आहे.



# दिव्यांग संघटनेच्या वतीने दिव्यांगाचा विवाह सोहळाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी**

शहरातील व जिल्ह्यातील अनेक दिव्यांग विवाह पासून वंचित आहे गरजू दिव्यांगांना विवाह आयोजित करण्यात आला आहे जालना शहरातील गरजू दिव्यांगाचा विवाह आयोजित करण्यात आला आहे जे दिव्यांग मुलं मुलींनी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची संपर्क साधावा असे आव्हान सकल दिव्यांग सामाजिक संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे यावेळी दिव्यांग संघटनेचे शंकर शिरगुळे जिल्हा अध्यक्ष राहुल मुळे शिवसेना दिव्यांग सेल शिवसेना जिल्हाध्यक्ष अनिल मगदूले राजेश काविटी जगदीश सातपुते सविता बोराडे रेणुका वाळूकर आदींची उपस्थिती होती.

# चोरीचे सोने खरेदी केल्या प्रकरणी दाखल गुन्हा उच्च न्यायालयाकडून रद्द

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी येथील सोने व्यापारी पियुष्य सतीश बेद्रे यांच्यावर चोरीचे सोने घेतले असा दाखल झालेला गुन्हा मा.उच्च न्यायालयाने रद्द ठरवला आहे..**



कळंब (जि. उस्मानाबाद) येथील जबरी चोरी प्रकरणातील (गु.र. नं. ०२९६/२०२२) आरोपी अटक झाल्यानंतर त्याच्या निवेदनानुसार आष्टी येथील पियुष सतीश बेंद्रे यांनी चोरी केलेले सोने खरेदी केले आहे यावरून त्यांना आरोपी करण्यात आले होते दाखल केलेले याविरुद्ध त्यांनी खंडपीठामध्ये धाव घेतली आणि या गुन्ह्यात दाखल झालेला प्रथम खबरी अहवाल रद्द करण्यात यावा अशी विनंती केली होती त्यानुसार.. भा.दं.वि. कलम ३९४, ४११ सह ३४ चे आरोप न्यायमूर्ती संजय देशमुख व न्यायमूर्ती विभा कणकणवाडी यांच्या खंडपीठाने १६ जुलै २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार प्रथम खबरी अहवाल आणि दोषारोप पत्र हे दोन्ही रद्द ठरले आहेत. याप्रकरणी पियुष बेद्रे यांचे तर्फे आष्टी येथील मूळ रहिवासी असलेले उच्च न्यायालयातील प्रसिद्ध वकील ॲड. अमरसिंह शंकर काकडे यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत याचिका दाखल केली होती. त्यांनी न्यायालयात युक्तिवाद केला की– एफ.आय.आर. मध्ये आरोपीचे नाव नाही. आरोपी समाजात प्रतिष्ठित असून कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. तपासात चोरीचे कोणतेही साहित्य जप्त झालेले नाही. सरकारी पक्षाने आरोप कायम ठेवण्याचा प्रयत्न केला; परंतु न्यायालयाने तपशीलवार दस्तऐवज तपासून "फक्त शंका पुरेशी नाही," असे ठरवले. न्यायालयाने नमूद केले की शंका-आधारित खटला चालवणे हा न्याय-प्रक्रियेचा दुरुपयोग ठरेल; त्यामुळे आरोपीला त्वरित दोष मुक्त केले जावे अशी विनंती मान्य केली गेली आहे या निर्णयामुळे आरोपीवरचा न्यायालयीन खटला थांबवण्यात आला. या निकालामुळे आरोपीवरील खोटा ठपका दूर झाला असून, ही कार्यवाही म्हणजे निर्दोष व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण करणारा निर्णय मानला जात आहे.

## पान १ वरून...

### मराठवाड्यातील शेतकऱ्यांमध्ये

व हिंगोली या पाच जिल्ह्यांतील ९ लाख २२ हजार ३३२ शेतकऱ्यांनी १२ लाख ३० हजार २८४ अर्जाद्वारे सुमारे ८ लाख ४ हजार ७०७ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. शेतकऱ्यांना आपले पीक विमा संरक्षित करण्यासाठी ३१ जुलै ही अंतिम मुदत आहे.

-------

### संघर्ष आपल्या रक्तात; तो शेवटपर्यंत

मुळात संघर्ष हा आपल्या रक्तात आहे व तो आपण शेवटपर्यंत आवश्यकता असेल तिथे करत राहू, असेही धनंजय मुंडे म्हणाले. या काही महिन्यांच्या काळात अतिशय शांत राहून मी विरोधकांना उत्तर दिले नाही, सर्वजण म्हणायचे धनंजय प्रत्युत्तर का देत नाही, मात्र मी मनाशी ठरवले होते की प्रत्युत्तर द्यायचे नाही. पण काहींनी याचा गैरफायदा घेत आमच्या अस्मिता दुखावल्या. काहींनी तर गुणवत्तेवर आधारित नोकऱ्या मिळवलेल्या अधिकारी कर्मचारी यांची जात काढून त्यांना टोकाचा त्रास दिला, अगदी शासनाचे धोरण असलेल्या बिंदू नामावली वरून सुध्दा टार्गेट केले गेले, तेही सहन केले, मात्र आमच्या अस्मिता आणि गुणवत्तेवर आक्षेप घेणाऱ्यांना सांगतो, आता बास! यापुढे सहन करणार नाही; अशा शब्दात धनंजय मुंडे यांनी अनभिक्षिप्त इशारा दिला आहे. या अधिवेशनाच्या माध्यमातून समाजातील गुणवत्तेच्या आधारावर आपल्या जीवनात उच्च पद प्राप्त करून प्रशासकीय सेवा, वैद्यकीय सेवा, पत्रकारिता, उद्योग अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिमानास्पद कामगिरी करून दाखवली, त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी प्रशासकीय सेवेत प्रधान सचिव म्हणून उत्तम कामगिरी करणाऱ्या सुमंत भांगे यांच्याबाबत बोलताना धनंजय मुंडे यांनी मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचा जो शासन निर्णय राज्य सरकारने घेतला, तो स्वतः सुमंत भांगे यांनी ड्राफ्ट केलेला होता, याचाही आवर्जून उल्लेख श्री. मुंडे यांनी केला. ज्याला जातीयवाद करायचा त्यांना खुशाल करू द्या, आपण मात्र कधीही कुणाची जात पाहून काम करणार नाहीत. स्व. मुंडे साहेब व स्व. पंडित अण्णा मुंडे यांनी सर्वसमावेशक कामाची शिकवण दिली, त्यातून वाटचाल करत असताना आजवर जात पाहून मी कधी राजकारण केले नाही, ज्या दिवशी जात पाहून राजकारण करण्याची वेळ येईल, त्यादिवशी राजकारण सोडून देईन, असेही धनंजय मुंडे यावेळी बोलताना म्हणाले. या वाईट काळात सातत्याने समाजाने माझ्या पाठीशी खंबीर ताकत उभी केली, माझ्या कातडीचे जोडे करूनही मी ते ऋण फेडू शकणार नाही. आपली परंपरा व अस्मिता जोपासण्यासाठी तसेच स्पर्धा परीक्षा करणाऱ्या मुलांना मोठ्या शहरांमध्ये वसतिगृहे व अन्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री यांनी आपल्याला सूचना केलेली असून, त्यासाठी कुणाकडेही मागणी करणार नाही, आपला हक्क आपण मिळवू, असे ठाम मत यावेळी मुंडेंनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनीही मार्गदर्शन केले. वंजारी समाज आज प्रगतीच्या वाटेवर असताना सर्वांना सोबत घेऊन चालावे. एकोप्याने राहून एकमेकांना शिक्षण आणि सदाचाराचा संदेश देऊ, असे त्यांनी आवर्जून नमूद केले. यावेळी व्यासपीठावर माजी प्रधान सचिव सुमंत भांगे, यांच्यासह प्रशासकीय सेवा, वैद्यकीय सेवा, शिक्षण, उद्योग, पत्रकारिता, क्रीडा, साहित्य, संस्कृती इत्यादी क्षेत्रातील मान्यवरांचा तसेच यूपीएससी व एमपीएससी सह विविध स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या नवनिर्वाचित अधिकाऱ्यांचा विशेष गौरव सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन आयोजक तथा भारतीय रेल्वे बोर्डाचे सदस्य धनराज गुट्टे यांनी केले, तर स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. अमोल गित्ते यांनी भूमिका बजावलीव्यासपीठावर माजी आ. संजय दौंड, लातूर जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, ज्येष्ठ नेत्या सुशीला ताई मोराले, धुळे महापालिकेचे माजी महापौर प्रदीप करपे, मीराबाई संस्थानच्या महंत ह. भ. प. राधा ताई सानप, आदिनाथ महाराज, पानेगावकर महाराज, यांच्या सह विविध पक्ष, संघटनेचे पदाधिकारी, आजी माजी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासकीय सेवेतील अधिकारी आदी उपस्थित होते.

------------

### मुले स्पेस सायंटिस्ट

एक नवीन उत्सुकता जागृत झाली आहे. आता लहान मुले म्हणतात की आपणही अंतराळात जाऊ. आपण चंद्रावरही उतरू. आपण अवकाश शास्त्रज्ञ बनू. यावरून मुले स्पेस सायंटिस्ट बनू इच्छितात, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, मला आठवते जेव्हा ऑगस्ट २०२३ मध्ये चांद्रयान यशस्वीरित्या उतरले होते. तेव्हा देशात एक नवीन वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर आताही शुक्ला यांच्या निमित्ताने सुद्धा देशात असेच उत्साहाचे वातावरण तयार झाले आहे. याची सर्वांत अधिक उत्सूकता ही मुलांमध्ये निर्माण झाली आहे. यामुळेच मुले स्पेस सायंटिस्ट बनू इच्छितात, असे वक्तव्य नरेंद्र मोदी यांनी बोलताना केले. यावेळी पंत प्रधानांनी इतर विषयांवरही भाष्य केले.

----------

### मंत्री पदाची खदखद प्रकाश दादांनी

अजित पवार यांनी आजपर्यंत हेच केले आहे आपला केवळ वापर केला गेल्या ३५ वर्षाचा अनुभव आहे ३५ वर्षांमध्ये त्यांनी कधी विश्वासात घेतले नाही मात्र यावेळी विश्वासात घेतले नाही तर आपण आपला निर्णय कळवणार असल्याचे सांगतानाच त्यांनी मात्र पक्षाविरुद्ध दंड थोपटले आहेत उघड मंत्री पद मला मिळावे असे म्हटले नसले तरी त्यांच्या बोलण्यातून धनंजय मुंडे यांच्या मंत्रीपदाला त्यांचा विरोध असल्याचे यातून स्पष्ट जाणवत आहे बीड जिल्हा मंत्री पदासाठी ओबीसीला राखीव आहे म्हणजेच धनंजय मुंडे यांना मंत्रीपद दिले जाण्याची संकेतच यातून मिळत आहेत प्रामुख्याने पक्ष नेहमी बोलणारा फिरणारा यांना सरकारमध्ये संधी देतो आज प्रकाश दादाचे वय पाहता ते पक्षासाठी फार ठरू शकत नाहीत ही सत्य परिस्थिती आहे विशेषतः मागील निवडणुकीमध्ये धनंजय मुंडे यांनी शेवटच्या क्षणी जोरदार प्रचार केल्यामुळे प्रकाश दादांचा विजय निश्चित झाला हे नाकारता येणार नाही असे असताना देखील मुंडे यांच्या मंत्रीपदाला नकळत विरोध करणे आणि दोन्ही पवारांना टार्गेट करणे यावरून प्रकाश सोळंके यांनी दोन्ही पवारांचा रोष ओढावून घेतल्याचे यावरून दिसत आहे तसे पाहिले तर प्रकाश सोळंके आणि पवार कुटुंब यांचे कौटुंबिक नाते आहे प्रकाश दादा यांचे बंधू धैर्यशील सोळुंके आणि अजित दादा यांचे जवळचे नाते असल्याने कदाचित संधी मिळेल अशी आशा दादांना असावी मात्र दादांना पक्षात घेतले तर पुन्हा सग्या सोयऱ्यांचा आरोप राष्ट्रवादीवर होऊ शकतो. त्यामुळे त्यांचा विचार केला जात नसल्याचे बोलले जात आहे. शरद पवार, अजित पवार या दोघांनी आपला वापर केला असे म्हणत रोष पत्कारून घेतला. मंत्री पदाला माझी जात आढवी येते असे म्हणत जिल्ह्यात मंत्री पद ओबीसीसाठी राखीव आहे असे म्हणत मुंडे यांच्या मंत्री पदाला विरोधच दर्शवला असे दिसते.

-----------

### अल्पवयीन मुलीच्या तोंडावर

वेळ दिसली नाही. त्यानंतर मुलीची आई तिला आजूबाजूच्या परिसारत शोधू लागली. मुलीची आई तिला शोधत असताना तिला मुलगी दोरीने बांधलेल्या अवस्थेत आढळली. मुलीला अशा अवस्थेत पाहिल्यानंतर तिने मुलीला सोडवलं. या घटनेमुळे गावात भीतीचं वातावरण पसरलं आहे. पोलिसांनी या प्रकरणी एफआयआर दाखल केला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत. वडाळी गावात १७ वर्षीय मुलीसोबत घडलेली ही पहिलीच घटना नाही. अशा प्रकारची घटना वडाळी गावात तिसऱ्यांदा घडली आहे. यापूर्वी २७ जून २०२४ आणि १७ ऑगस्ट २०२४ रोजीही असेच प्रकार घडले होते. त्यावेळी तक्रार करूनही पोलिसांनी तपास केला नाही, असा आरोप गावकऱ्यांनी केला आहे.

----------------

### युतीच्या दिशेने आणखी

राज यांनी उद्धव यांना पुष्पगुच्छ देत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. राज ठाकरेंसोबत मनसेचे नेते आणि माजी आमदार बाळा नांदगावकर आणि नितीन सरदेसाई देखील उपस्थित होते. यावेळी मातोश्रीवर दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. उपस्थित अनेक कार्यकर्त्यांनी या भेटीविषयी आनंद व्यक्त केला. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर राज ठाकरेंच्या या कृतीने दोन्ही ठाकरे बंधूंच्या युतीच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे पडल्याचे मानले जात आहे. काही दिवसांपुर्वी हिंदी सक्तीविरोधातील आंदोलनाच्या यशानंतर झालेल्या मेळाव्यात या दोन्ही बंधुंची भेट झाली होती. ती मोठी बातमी ठरली होती. तेव्हाही या दोघांच्या एकत्र येण्याने दोन्ही पक्षात प्रचंड उत्साह दिसून आला होता. शुभेच्छा दिल्यानंतर २० मिनिटांनी राज ठाकरे मातोश्रीवरून बाहेर पडले. दरम्यान, सहा वर्षांपुर्वी अमित ठाकरेंच्या लग्नाचे आमंत्रण देण्यासाठीही राज मातोश्रीवर गेले होते. तसेच बाळासाहेब ठाकरेंच्या अखेरच्या दिवसातही ते मातोश्रीवर काही काळ गेले होते. २००६ साली शिवसेनेला जय महाराष्ट्र करत राज ठाकरे यांनी स्वतःच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाची स्थापना केली होती. तेव्हापासून ठाकरे कुटुंबात आणि विशेषतः या दोन भावांमध्ये एक राजकीय आणि भावनिक पोकळी निर्माण झाली होती. दरम्यान, अनेक कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये हे दोन्ही नेते एकत्र आले असले तरी, राज ठाकरे यांनी मातोश्रीची पायरी चढणे हे गेल्या १८ वर्षांत घडले नव्हते. त्यामुळे रविवारची भेट ही केवळ वाढदिवसाच्या शुभेच्छांपुरती मर्यादित नसून, ती दोन भावांमधील दुरावा संपवणारी एक ऐतिहासिक घटना मानली जात आहे.

**भेटीला राजकीय किनार**

राज ठाकरे यांची ही भेट जरी कौटुंबिक असली तरी त्याला एक मोठी राजकीय किनार आहे. गेल्या काही वर्षांत राज्यातील राजकीय समीकरणे वेगाने बदलली आहेत. अशा परिस्थितीत दोन ठाकरे बंधू एकत्र आल्यास राज्याच्या राजकारणावर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात.

-----------

### पुण्यात खडसे यांचे जावई रेव्ह

मला यासंदर्भातील माहिती तुमच्याकडूनच पहिल्यांदा भेटत आहे, हे होणारच होतं हे मला माहीत आहे. त्यांना अडकवण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप एकनाथ खडसे यांनी केला. मात्र, यामध्ये राजकीय कारवाईचा वास येत आहे का? अशी विचारणा केली असता खडसे यांनी शक्यता नाकारता येत नाही, अशी प्रतिक्रिया दिली. ते पुढे म्हणाले की, या प्रकरणी स्थानिक पोलिस अजिबात तपास करणार नाहीत. त्यांच्यावर दबाव असू शकतो. जो दोषी असेल त्याला शिक्षा झाली पाहिजे असे सुद्धा खडसे म्हणाले. मात्र मला या कारवाई संदर्भात अजूनही पूर्ण माहिती नाही. मी स्पष्ट बोलणा-यांपैकी आहे. त्यामुळे मला पूर्ण माहिती मिळाल्यानंतर बोलेन असे त्यांनी सांगितले.

--------------

### अनैतिक संबंधाच्या संशयावरुन

आणि जखमा आढळून आल्याने त्यांचा मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. मारहाण करणाऱ्यांचा शोध घेण्याचे पोलिसांसमोर आव्हान होते. मात्र, मंठा आणि परतूर पोलिसांनी संयुक्तपणे तपास हाती घेतला असता हा खून फॅक्टरीतील निवृत्ती सवडे आणि गणेश अंभोरे यांनी केल्याची माहिती समोर आली. त्यानुसार या दोघांना अटक करण्यात आली. ही कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली मंठा ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक कैलास भारती, फौजदार संतोष माळगे यांच्यासह पोलीस पथकाने केली. या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक कैलास भारती हे करीत आहेत.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. २८ जुलै २०२५



## संदीप घमाट बेपत्ता



गेवराई : आमच्या नागझरी गावातील संदिप घमाट हल्ली मुक्काम रांजणी ता. गेवराई जि. बीड येथे राहत आहेत त्यांचा मुलगा राजेंद्रसंदिपघमाट हा दोन्ही डोळ्याने दिव्यागन आहे हा आपल्या राहत्या घरून वार शुक्रवार दिनांक ११/७/२०२५ रोजी रांजणी येथून आपली पगार काढण्यासाठी गडी कारखाना येथे गेला होता परंतु उशिरा पर्यंत घरी न आल्याने त्याचे आई वडील त्याचा शोध घेत आहेत तरी मी सोशल मिडियाच्या माध्यमातून सर्व मित्र परिवारांना विनंती करतो की हा आपल्या प्रत्येक ग्रुप वर शेअर करून या मुलाचा शोध घेता येईल अशी सर्वांना विनंती करतो त्याच्यासोबत त्याचे आधार कार्ड आहे.

राजेंद्रसंदीपघमाट आसे नाव आहे .त्याचे वर्णन : रंग काळा सावळा अंगावरती घातलेले कपडे पांढरा शर्ट व काळी पॅन्ट आहे तरी कोणाला आढळल्यास या क्रमांकावर संपर्क करा. वशिष्ठ घमाट : ९८८१९८८८९३, संदीप घमाट : ९५७९५१२९१२, मदन भुसारे : ९५७९७८८८७७

# लिंगायत समाज स्मशान भुमिच्या जागेसाठी मृतदेह नगर परिषद कार्यालयात आणून अंदोलन

## राजकिशोर मोदी यांच्या मध्यस्थीने मृतदेहावर झाले अंत्यसंस्कार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील लिंगायत समाजाला अंत्यविधी साठीची जागा सकलेश्वर मंदिर पुरातत्व विभागाने ताब्यात घेतल्यामुळे सध्या समाजास अंत्यविधी साठी जागाच उपलब्ध नसल्याने अंबाजोगाई नगर परिषदेचे माजी कार्यालयीन अधीक्षक गणपत वाघमारे यांचा मृतदेह अंबाजोगाई नगर परिषद कार्यालयात आणून समाजाच्या वतीने आंदोलन करण्यात आले. बराच वेळ समाजाच्या वतीने स्मशानभूमीच्या जागेसाठी आंदोलन केले. अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी येथे येऊन आंदोलन कर्त्या समाजबांधवांची भेट घेतली. याप्रश्नी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांच्याशी बोलून याप्रश्नी दोन दिवसात तोडगा काढला जाईल असे सांगितले.



राजकिशोर मोदी यांच्यावर विश्वास ठेवून आंदोलनकर्त्या समाजाने ते करत असलेले आंदोलन स्थगित करून मृतदेहावर अंत्यसंस्कार केले.

याबाबत सविस्तर माहिती अशी की अंबाजोगाई येथील लिंगायत समाजाची स्मशानभुमि शहरालगत असलेल्या बाराखांबी परिसरात आहे .मात्र तेथील जागा पुरातत्व खात्याने सदर जागा उत्खननासाठी ताब्यात घेऊन अतिक्रमित केली आहे . त्यामुळे स्थानिक लिंगायत समाजबांधव यांच्या अंत्यविधी साठी जागाच शिल्लक राहिली नाही . आज ज्या जागेवर अंत्यविधी केला जात होता यावेळी विभागाकडून विरोध करण्यात आला. त्यामुळे सदर बांधवानी तो मृतदेह थेट नगर परिषद कार्यालयात आणून येथील प्रशासनाच्या विरोधात निदर्शने केली. समाजास दिलेल्या जागेसंदर्भात अंबाजोगाई नगर परिषद, भूमी अभिलेख कार्यालय व पुरातन विभाग यांच्याकडूनच समाजबांधवांची दिशाभूल केली जात असल्याचे यावेळी आंदोलन कर्त्या समाजबांधवानी सांगितले.

मात्र राजकिशोर मोदी यांनी यावेळी प्रसंगाचे गंभीर्य लक्षात घेऊन आंदोलन स्थळी भेट दिली. लिंगायत समाजाचे म्हणणे ऐकून घेऊन तात्काळ उपजिल्हाधिकारी , मुख्याधिकारी तसेच नगर परिषदेचे अधीक्षक यांच्याशी फोनवर चर्चा करून आंदोलन कर्त्या समाजाशी संवाद साधला व येत्या दोन दिवसात स्मशानभूमीच्या जागेसंदर्भाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठीचा शब्द दिल्याने अंबाजोगाई नगर परिषद कार्यालयातुन मृतदेह स्मशानभूमीत नेऊन अंत्यविधी करण्यात आला. बराच वेळ नगर परिषदेचा कोणताही कर्मचारी आंदोलन स्थळी न आल्याने लिंगायत समाजाच्या वतीने नगर परिषद प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवला व राजकिशोर मोदी यांनी समाजाची भेट घेऊन मृतदेहाची होणारी हेळसांड थांबवून स्मशानभूमीच्या जागे संदर्भाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले त्याबद्दल लिंगायत समाजाच्या वतीने राजकिशोर मोदी यांना धन्यवाद दिले.

# थोडक्यात...

## आई-वडील गेल्याने अनाथ झालेल्या मुलांच्या मदतीसाठी सरसावले शेकडो हात

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील ग्रामीण रुग्णालय जवळ हुतात्मा चौकात बच्चे धडके ठार झालेल्या वायकर दाम्पत्याच्या अनाथ मुलांना मदतीसाठी शेकडे हात पुढे आले आहेत पाटोदा सकल मराठा समाज संघटना बिनशूर वैद्यकीय सौंदना नायगाव राऊतवाडी आदी गावातील समाजसेवकांनी समाज माध्यमावरून मदतीची आव्हान केले होते या आव्हानाला शेकडून मी प्रतिसाद दिला सुरेंद्र टिपटे यांच्याकडे ५० हजारापेक्षा जास्त रक्कम जमा झाली तालुक्यातील ग्रामीण भागातही निधी संकलन केले जात आहे मदतीची रक्कम अनाथ झालेल्या सुदर्शन आणि आदित्य यांच्या बँकेच्या खात्यावर टाकण्यात येणार आहे गुरुवारी दुपारी घाटेवाडी येथील बाळू केशव वायकर आणि लता वाळू बाळू वायकर हे दानपती दुचाकीवरून पाठवलेला येत होते दोन वाजण्याच्या सुमारास पुणे दोन बसणे दिलेल्या धडके दांपत्य जागी ठार झाले ऊसतोड मजूर असलेल्या वायकर दांपत्या सुदर्शन आणि आदित्य अशा दोन अल्पवयीन मुल आहेत अपघातात आई-वडील ठार झाले घरांमध्ये त्यांचा सांभाळ करणारे कोणीहीच नसल्याने माहिती पुढे आली आणि पडद्यातील सुरेंद्र गुप्त्यांनी मदतीची आव्हान समाज माध्यमातून एका दिवसात जमा झाली शिवाय ग्रामीण भागात व गाव पातळीवर काही तरुणांनी निधी संकलन केले आहे आनंद झालेल्या सुदर्शन आणि आदित त्यांच्या नावाने बँक खाते उघडून रक्कम मदत ठेवून खात्यात ठेवण्यात येणार आहे काहींनी शिक्षणाचा खर्च उचलण्याचा संकल्प केला आहे समाज ज्यामध्ये माणुसकी अजूनही जिवंत असल्याचे या घटनेवरून समजते

## तरुण पिढीला ऑनलाइन जुगाराचा विळखा; मोबाइलचा गैरवापर वाढला

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आधुनिक जगात मोबाईल आल्यामुळे क्रांती झाली आणि जग जवळ आले. हळुहळु मोबाईल सर्वांच्याच आयुष्याचा अविभाज्य घटक बनला. मोबाईलचे चांगले आणि वाईट दोन्हीही परिणाम आहेत. परंतु मोबाईलचे दुष्परिणाम आता हळूहळू पुढे येऊ लागले आहेत. दैनंदिन माहितीची देवाणघेवाण, सवांद साधने यासह अनेक गोष्टी स्मार्ट फोनमुळे सोप्या झाल्या आहेत. परंतु मोबाईलचे फायदे आणि तोटेही आहेत. मोबाइलचा चांगला वापर करण्याऐवजी आता गैरवापर जास्त होत आहे. याला तरुण पिढी बळी पडू लागली आहे. अलिकडे ऑनलाइन जुगाराचा नवीन फंडा बाजारात धुमाकूळ घालत आहे. शहरात असलेल्या ऑनलाइन गेमचे लोण आता ग्रामीण भागातही आले आहे. त्यात तरुण पिढी ऑनलाइन जुगाराच्या जाळ्यात अडकत चालली आहे. या जुगारात अपयश आल्याने अनेक तरुणांनी जीवन संपविल्याच्या घटनाही घडलेल्या आपण पाहत आहोत. अभिनेते, नामांकित खेळाडू, ऑनलाइन जुगाराची जाहिरात करतात. जाहीरातीवर विश्वास ठेऊन तरुणाई जुगाराच्या विळख्यात अडकत आहे. कष्ट न करता झटपट पैसे कमावण्याच्या नादात अनेकांनी पैसे गमावले आहेत. ऑनलाइन गेम सोबत आता कॉइन ने मार्केट मध्ये जागा घेतली आहे. भरपूर परतावा मिळतो या नादात एजेंट आपल्याला मार्केट मधील कोईन ची ओळख करून देत आहेत. जास्त प्रमाणात पैसे मिळतील च्या नादात अनेकजण कर्ज बाजारी सुद्धा झाले आहेत आणि त्यातून पुढे आत्महत्या सारखे प्रकरण घडत आहेत.

## तालुकाध्यक्षपदी गणेश रणदिवे



पाटोदा । प्रतिनिधी

२६ ७ २०२५ वार शनिवार रोजी लहुजी शक्ती सेनेच्या संस्थापक अध्यक्ष विष्णू भाऊ कसबे यांच्या उपस्थितीत पाटोदा येथे मातंग समाज परिवर्तन मेळावा ठेवण्यात आला होता या वेळी मोठ्या प्रमाणात मातंग समाज बांधव युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येत उपस्थित होते यावेळी विष्णू भाऊ कसबे यांच्या व भाऊसाहेब भवर नगरपंचायत सभापती किशोर अडागळे पुणे जिल्हा अध्यक्ष नितीन भाऊ दोडके जिल्हाध्यक्ष लालासाहेब दुनघव उपजिल्हाध्यक्ष दीपक गाडे आंबेजोगाई चे तालुका अध्यक्ष आदित्य मोठे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन तालुका अध्यक्षपदी गणेश रणदिवे यांची निवड करण्यात आली यावेळी उपस्थित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विजय आढागळे उपाध्यक्ष चेतन जावळे समन्वय सुजित अडागळे गेवराई चे अनिल भिसे नितीन अडागळे विकी साठे सुरेखा अडागळे शारदा रणदिवे अनिता साठे वंदना चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

# जोपर्यंत चंद्र-सूर्य तारे आहेत तोपर्यत पाकिस्तान भारताचा मारच खाणार -आ.धस

आष्टी । प्रतिनिधी

**गेली ७५ वर्षापासून स्वातंत्र्य मिळाल्यापासून पाकिस्तान भारताच्या कुरापती काढत आला आहे..घुसखोरी करून आलेल्या दहशतवाद्यांना प्रत्येक वेळी त्यांना भारतीय जवानांनी प्रत्युत्तर देऊन.. अगोदर केवळ निषेध व्हायचा परंतु आता पाकिस्तानात घुसून मारण्यात येत आहे..**

आज संपूर्ण देश सुरक्षित आणि बिनधास्त राहात आहोत ते फक्त भारतीय जवानांमुळेच.. त्यामुळेच जोपर्यंत चंद्र सूर्य तारे आहेत तोपर्यत पाकिस्तान भारताचा मारच खाणार आहे पाकिस्तानने कधीही भारताच्या नादी लागू नये असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले. कारगील विजय दिनाच्या औचित्याने आष्टी शहरात सैनिक सेवा संघ मुख्यालय बीड जिल्हा व त्रिदल संघटनेच्या वतीने भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. या यात्रेचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे झाला यावेळी प्रमुख मार्गदर्शक करताना आ. सुरेश धस बोलत होते.



यावेळी कारगील युद्धात शहीद झालेले पाटोदा तालुक्याचे सुपुत्र शहीद सुभाष सानप यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी

व्यासपीठावर अभिनेते तथा व्याख्याते विक्रम जगताप,अभय धोंडे,तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, त्रिदल संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अंकुश खोटे,अशोक भोसले,सुनील रेडेकर यांचेसह सह त्रिदल संघटनेचे पदाधिकारी,व्यापारी, पत्रकार ,विद्यार्थी,नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले , '' ३ मे १९९९ रोजी सुरू झालेल्या या युद्धात भारतीय लष्कराने 'ऑपरेशन विजय' अंतर्गत ८५ दिवसांच्या संघर्षानंतर २६ जुलै १९९९ रोजी टायगर हिलवर तिरंगा फडकवून विजय प्राप्त केला. या लढ्यात ५२७ भारतीय जवानांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. यामध्ये कॅप्टन विक्रम बत्रा, लेफ्टनंट संदीप उन्नीकृष्णन, ग्रेनेडियर योगेंद्र सिंह यादव यांसारख्या वीरांनी अतुलनीय शौर्य गाजवले.याच युद्धात पाटोदा तालुक्यातील शहीद सुभाष सानप यांनी देशासाठी प्राणार्पण केले. त्यांचे बलिदान संपूर्ण बीड जिल्ह्यासाठी गौरवाची आठवण आहे.भारतीय जवान देशाच्या सीमारेषांवर रात्रंदिवस सज्ज असून त्यांच्या त्यागामुळेच देशात शांतता आणि विकास नांदतो, हे विसरता कामा नये.''

शहीद सुभाष सानप यांच्या बलिदानाचा गौरव करताना उपस्थितांनी अश्रुपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी आजी माजी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अंकुश खोटे बोलताना म्हणाले की,तब्बल ६६ दिवस भारत मातेच्या शुर वीरांनी रात्र दिवस झुंज देऊन आपल्याला कारगील विजय मिळून दिला.२६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस म्हूून आज आपण साजरा करत आहोत. आजच्या तरुणांईला यावेळीच्या पराक्रमाची जाणीव होण्यासाठीचा हा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी अभिनेते तथा व्याख्याते विक्रम जगताप म्हणाले,सैनिकांचे पराक्रम आणि त्याग आपले लोक लगेच विसरून जातात.सैनिक आणि त्यांचा त्याग या गोष्टीचे महत्व आपल्या लोकांना जोपर्यंत कळत नाही तोपर्यंत जाणीव होणार नाही. आपल्या सीमेवर काम करणाऱ्या प्रत्येक सैनिकाला आपल्या कर्तृत्वाची जाणीव असल्याने तो आपलं कर्तव्य बजावत आहे तो पैशासाठी काम करत नाही. तो देश सेवा करण्याचं ध्येय ठेवूनच आपले कर्तव्य सीमेवर करत असतो असे सांगत त्यांनी आपल्या दोन्ही

पान ६ वरून...

## ना.पंकजाताई मुंडे हे नाव

मुंडे प्रतिष्ठानच्या माध्यमातून गेली १५ वर्षे सामाजिक बांधिलकी जोपासत विविध सामाजिक उपक्रम राबवले गेले आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून प्लॉस्टिकचा वापर न करता कापडी पिशवीचा वापर करा व बॅनरबाजी करून फटाके फोडुन तसेच हार बुके वापरून पर्यावरणाला धोका होईल.असे न कराता समाजोपयोगी वंचित, उपेक्षित घटक विध्यार्थी यांच्या हितासाठी वाढदिवसचा इतर खर्च टाळून व पर्यावरण पुरक वाढदिवस साजरा करण्याचे आम्ही ठरवले होते. म्हणून शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करत किमान एका विद्यार्थ्याला एक वर्ष पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य वाटप केले असून विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाची रुची निर्माण व्हावी. तसेच प्रत्येक शाळेचा परिसर नैसर्गिक दिसावा, व पर्यावरण संतुलित राहावे व पर्यावरणाच्या अनुषंगाने वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे समाजा बरोबरच निसर्गाचे देखील आपण काही देणे लागतो त्यामुळे निसर्गाचे ऋणानुबंध जपण्यासाठी पर्यावरण जपने हि काळाची गरज आहे असल्याचे मत संजय आंधळे यांनी व्यक्त केले. यावेळी उपनगराध्यक्ष बन्सीधर मुंडे, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, शिवसेना तालुकाप्रमुख माऊली गोंडे, कृषी उत्पन्न बाजार समिति उपसभापती अनिल चोले, अशोक गोंडे, युवक मोर्चा तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे, ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री, डॉ. रोहिदास खोटे, सरपंच खोटे, दत्ता गोंडे, बाबुराव तवरे, शिवाजी गोंडे, गोरख गोंडे, गणेश गोंडे, संतोष शिंदे, सुंदर राठोड, बालासाहेब शिंदे, गंगाधर लोणकर, मधुकर खाडे, राजाभाऊ लोंढे, सुधाकर नागरगोजे, किशोर चाटे, देवानंद तांबडे, शालेय समिती अध्यक्ष, मायकर, अण्णासाहेब शिंदे, शरद राठोड, रामभाऊ लांडे, संतोष खाडे, व आदी भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाजपाच्या वतीने सामाजिक

मंडळ अध्यक्षा रूपाली कचरे,पात्रुड मंडळ अध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके यांनी पालावरील लोकांना किराणा किट वाटप केले व अरुण राऊत यांनी पालावरील महिलांना साड्या वाटप व पर्यावरण पूरक पिशवी वितरण करण्यात आल्या.त्यानंतर सकाळी १०:०० वाजता महात्मा फुले शाळेत डॉ.प्रशांत पाटील यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.आयटीआय कॉलेज येथे वृक्षारोपण हे अरुण राऊत यांनी तर मंगलनाथ मंदिर येथे पंकजाताई मुंडेंच्या दीर्घायुष्यासाठी मंगलनाथाची महाआरती व मंगलनाथ मंदिर परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयात ऊसतोड मजूर महिलांच्या आरोग्याची तपासणी,विनायक रत्नपारखी यांच्या वतीने रुग्णांना फळ वाटप आणि सर्वात शेवटी श्रावणी पहिला शनिवार निमित्त ह्या योगा योगाने महारूद्र हनुमानाची आरती व रूपाली कचरे यांच्यावतीने राम नाम जपाच्या पुस्तकांचं वाटप या सामूहिक लेखना मधून दोन लाख ३१ हजार राम जप पंकजाताई मुंडेंच्या दीर्घायुष्यासाठी करण्यात आले.या विविध कार्यक्रमास भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके,डॉ अशोक तिडके, दीपक मुंडे, सत्यनारायण उनवणे,ज्ञानेश्वर सरवदे,ईश्वर खुरपे अविनाश कांडुरे , कैलास खुरपे,पवन मोगरेकर, बाळासाहेब क्षीरसागर,उमेश जाधव,रामेश्वर चव्हाण,सुभाष कांबळे,संतोष जाधव,गौरी देशमुख,पूजा मुंडकर,चित्रा पाठक,अनिता अलकुंटे,शरद कचरे,दत्ता क्षिरसागर,मनोज कोरडे,नामदेव मुळे, राम शिंदे,दत्ता महाजन,नारायण मेंडके,सिद्धेश्वर राठोड,भरत जोशी, रवी गायकवाड, गंगाधरराव आगे, रामराव जाधव, विष्णू आगे,कल्याण शेप, सचिन तौर, बाळासाहेब साळवे, भारती घुबडे, कमलाकर जोशी , जीवन कोरडे, अशोक कीर्ते, नितीन डुकरे, दीपक गरड, मनमथ लांडगे, मयूर राऊत व राजेभाऊ सरवदे यांची उपस्थिती होती.

## लालबुंद निखाऱ्यावरून

यांनी श्रीफळ अर्पण करीत प्रथम लालबुंद निखाऱ्यावर चालण्याची परंपरा सुरू केली. त्यानंतर शेकडो महिला, पुरुष, वृद्ध व तरुण भाविकांनी उघड्या पायांनी त्या प्रखर गरम विस्तवावरून चालून नवसपूर्ती केली.

हनुमान टाकळीच्या या यात्रेचे एक वैशिष्ट्य म्हणजे भाविक निखाऱ्यावरून चालत असताना मंदिरातील गोमयी मूर्तीला घाम फुटतो, असे सांगितले जाते. १२ फूट लांब, २ फूट रुंद आणि ६ फूट खोल खड्ड्यात बोरी लाकडांचा विस्तव तयार केला जातो. साधारणतः विस्तवाजवळ उभे राहणे देखील अवघड असते, तरीही भक्तगण विश्वासाने आणि भक्तीने त्या विस्तवावरून चालून बाहेर येतात.

सन २००९ पासून सुरू झालेल्या मंदिराच्या जिर्णोद्धाराचे कार्य आता अंतिम टप्प्यात असून, राजस्थानी दगडात उभारण्यात आलेले नवे मंदिर भक्तांचे आकर्षण ठरत आहे. यात्रेच्या निमित्ताने बाजार समितीचे सभापती सुभाष बर्डे, डॉ. वसंत डमाळ, किशोर बडबडे यांनी भाविकांचे स्वागत केले. पोपट फुंदे, प्रवीण शिरसाट यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी यात्रेच्या व्यवस्थेची पहाणी केली. पोलिस उपनिरीक्षक निवृत्ती आगरकर व त्यांच्या पोलीस पथकाने सुरक्षेची जबाबदारी पार पाडली. यात्रेतील खाद्यपदार्थांपैकी जिलेबी, गोडीशेव व वडापाव यांना मोठी मागणी होती.श्रावण मासाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर आषाढ अखेरीस झालेली ही यात्रा भक्तांसाठी अध्यात्म, श्रद्धा व नवसपूर्तीचा संगम ठरली.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या

होते. उद्घाटन कार्यक्रम जालना रोडवरील राजू कॉम्प्लेक्स येथे पार पडला. मराठा समाजाला आर्थिक सक्षम करायचे ध्येय असून त्यासाठी महामंडळाकडून अधिक मेहनत, परिश्रम घेण्यात येईल, असे पाटील यावेळी म्हणाले. या कार्यालयाच्या उद्घाटनानंतर यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात मेळावाही पार पडला. मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमातही पाटील यांनी मार्गदर्शन केले.

# मोठेवाडीच्या सासु व सुनेला सरपंच पदासह ग्रामपंचायत सदस्य पद पुन्हा बहाल

माजलगाव । प्रतिनिधी

सन २०२२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत सत्यभामा मारोती दळवी आणि उषा अशोक दवळी या सासु व सुन मौजे मोठेवाडी, ता. माजलगांव, जि. बीड येथुन सरपंच व ग्रामपंचायत सदस्य म्हणुन निवडुन आल्या होत्या, या दोघींच्या विरोधामध्ये पराभुत झालेल्या उमेदवाराने विजयी झालेल्या उमेदवारांच्या कुटुंबियांनी सरकारी जागेमध्ये घराचे बांधकाम व अतिक्रमण केले असल्याची तक्रार करुन त्यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १४ (ज) ५ चा भंग केला असल्याने त्यांना अपात्र घोषीत करावे अशी तक्रार मा. जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे केली होती. सदरील तक्रारीच्या अनुषंगाने मा. उपविभागीय अभियंता बीड यांनी अतिक्रमणाबाबत पंचनामा करुन सत्यभामा दळवी व उषा दळवी यांच्या कुटुंबाने सरकारी जागेवर अतिक्रमण केलेले आहे असा अहवाल सादर केला होता. त्यामुळे मा. जिल्हाधिकारी बीड यांनी सत्यभामा दळवी आणि उषा दळवी यांना सरपंच व ग्रामपंचायत सदस्य म्हणुन अपात्र घोषीत केले होते.

सदरील आदेशाचे विरोधात त्यांनी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे समोर अपिल सादर केले होते. तसेच मा. आयुक्तांकडे, जिल्हाधिकारी बीड यांच्या आदेशाला स्थगिती देण्याबाबत विनंती केली होती. परंतु मा. विभागीय आयुक्त यांनी त्यांचा स्थगिती अर्ज फेटाळला होता. मा. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे आदेशाचे विरोधात दोघींनी ॲड. सुदर्शन साळुंके व ॲड. महेंद्र पंडीतराव गंडले यांच्या मार्फत मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल करुन आव्हान दिले होते. सदरील रिट याचिकेवर दिनांक १८.०७.२०२५ रोजी सुनावणी होवुन मा. उच्च न्यायालयाचे मा. न्यायमुर्ती एस.जी. चपळगांवकर यांनी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचा आदेश रद्द करुन मा. जिल्हाधिकारी, बीड यांच्या आदेशाला स्थगिती देवुन सत्यभामा मारुती दळवी व उषा अशोक दळवी ह्या सासु-सुनेला पुन्हा मोठेवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच पद आणि ग्रामपंचायत सदस्य पद बहाल केले आहे.याचिकाकर्त्याच्या वतीने ॲड. सुदर्शन साळुंके व ॲड. महेंद्र पंडीतराव गंडले यांनी युक्तीवाद केला. तसेच त्यांना ॲड. सोमेश्वर माणिकराव मुंडीक यांनी सहकार्य केले.

गेल्या दोन पिढ्यांपासून आम्ही या जागेत राहातो, सदरील जागेचा आमच्या नावावर पि.टी.आर.असुन आमच्यावर खोटे आरोप करत त्याची कसलीही सहनिशा करता आम्हाला अपात्र केले होते, आमच्यावर अन्याय झाला होता.मात्र मा.उच्च न्यायालयाचे मा.न्यायमुर्ती एस.जी.चपळगांवकर यांनी आम्हाला न्याय दिला. सौ.सत्यभामा दळवी, सरपंच मोठेवाडी.

## पाटोद्याच्या मांजरा पुलावरील खड्ड्यांची परिस्थिती काही बदलेना

पाटोदा । प्रतिनिधी

देशभरात महामार्ग, बायपास आणि अंतर्गत रस्त्यांचे जाळे निर्माण होत असताना, पाटोदा शहरातील मांजरा नदीवरील पूल मात्र कायम खड्ड्यांच्या विळख्यात अडकलेलाच आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या पुलावरील खड्ड्यांची परिस्थिती जैसे थे असून, नागरिकांचे हाल दिवसेंदिवस वाढतच आहेत.या पुलावर जागोजागी मोठ मोठे खड्डे असून, त्यात पावसाच्या पाण्याचे साचलेले डबके नागरिकांच्या डोळ्यात धूळ फेकणारे ठरत आहेत. पायी चालणाऱ्यांना दररोज या पाण्यातून वाट काढावी लागत असून, वाहन चालकांनाही धोकादायक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे.रोजच्या प्रवासात वृद्ध, महिला व विद्यार्थ्यांना खड्ड्यांमुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा वाहनांची घसरण, स्लीप होणे आणि किरकोळ अपघात होत आहेत.स्थानिक प्रशासनाने या पुलाची डागडुजी करते मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. ''देश डिजिटल होत आहे, पण पाटोदा शहरातील पूल अजून खड्ड्यांत गाडलेला आहे'', अशी तिखट प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी दिली.पाटोदा शहराचा हा मुख्य पूल असून, याच मार्गावरून बाजारात ये-जा करणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवून सुरक्षित वाहतुकीसाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# प्रभारी गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनींना हवेत मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची बैठक घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निर्देश-कास्ट्राईब

माजलगाव। प्रतिनिधी

**येथील गेल्या अनेक वर्षापासून वादादित असूनसुद्धा प्रभारी गटशिक्षणाधिकारी असलेले रवींद्र महामुनी यांना महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने,वरिष्ठ कार्यालयास प्रतिद्वारे निवेदन दिले असता,त्यांनी ते स्वीकारण्यास नकार दिला.तेव्हा त्यांना शासन निर्णयाद्वारे - वाचा देऊन,शिक्षणाधिकारी (प्रा )यांना सादर केलेल्या निवेदनात जिल्हास्तरावरील प्रश्नांची सोडवणूक व्हावी यासाठी व तालुकास्तरीय शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी महासंघाची तीमाही बैठक आयोजित करावी याबाबतची आग्रही भूमिका मांडली असता त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निर्देश व सूचना आल्यानंतरच आपली बैठक आयोजित करण्यात येईल असे लेखी पत्र महासंघास दिले आहे. त्यामुळे महासंघाच्या पदाधिकाऱ्यां बरोबर शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून संताप व्यक्त केल्या जात आहे.**

महासंघाच्या वतीने शिक्षकांच्या जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी मागील एक महिन्यापासून गटशिक्षणाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलना नंतर बेमुदत घंटानाद आंदोलन सुरू असून या आंदोलनाची म्हणावी तशी दखल वरिष्ठ कार्यालयाने न घेतल्यामुळे व पूर्णतः मागण्या मान्य न झाल्यामुळे,येथील प्रभारी गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांना बळ पोहोचले आहे.

महासंघाने गटशिक्षणाधिकारी कार्यालयामार्फत,शासन निर्णयानुसार-वाचा देऊन-वरिष्ठ कार्यालयास पाठवलेल्या निवेदनात,गटशिक्षणाधिकारी कार्यालयाशी संबंधीत असलेल्या,एकूण प्रलंबित प्रस्तावांची संख्या व यादी




देण्यात यावी,सर्विस बुक नोंदी नियमित प्रामाणित करण्यात याव्यात,गेल्या अनेक वर्षापासून मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय तसेच सर्वसाधारण शिक्षक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी, महासंघाची बैठक आयोजित करण्यात आली नसल्यामुळे,ती तीमाही नियमित आयोजित करण्यात यावी.व महासंघाचे वरिष्ठ कार्यालयास प्रति द्वारे निवेदन स्वीकारावे या मागण्या कळविण्यात आल्या होत्या.परंतु त्यावरही शिक्षणाधिकारी(प्रा) यांच्याकडूनही कोणतेच लेखी स्वरूपात उत्तर महासंघास अद्यापपर्यंत मिळालेले नाही. प्रभारी गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांनी या मागण्या संदर्भाने महासंघास लेखी पत्र दिले असून त्यात,गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून वरिष्ठ कार्यालयास पाठवलेल्या प्रस्तावाच्या संख्यांची माहिती दिलेली आहे व याद्या संकलन सुरू असल्याचे,सर्विस बुक नोंदी नियमित प्रमाणित करण्यात येत असल्याचे,वरिष्ठ कार्यालयास प्रती निवेदन स्वीकारणे क्रमप्राप्त नसल्याचे म्हटले आहे.परंतु वास्तविकता यापेक्षा वेगळी आहे.त्यांना मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे निवेदन स्वीकारणे क्रमप्राप्त म्हणजेच योग्य वाटत नाही.हे यावरून स्पष्ट जाणवते.तसेच तीमाही बैठक आयोजित करण्यासाठी सुद्धा त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निर्देश व सूचना हव्या आहेत.वास्तविकता शासनाचेच असे पत्र आहे की,कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अधिकाऱ्यानी संघटनांची बैठक नियमित आयोजित करावी.या पत्रास केराची टोपली प्रभारी गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी यांनी वरिष्ठांच्या वरदहस्तामुळे दाखवली आहे,असे स्पष्ट निदर्शनास येते.

त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यानी याची गांभीर्याने नोंद घेणे आवश्यक आहे.असे महासंघाचे तालुकाध्यक्ष राहुलकुमार टाकणखार,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भारत टाकणखार,ता.सचिव अभिमन्यू इबिते,वसंत टाकणखार,रवी आदमाने,निलेश गावडे,अजीमोमुद्दीन खतीब,हनुमंत पांढरपोटे, शिवाजी भाळशंकर,प्रवीण जाधव,अमोल राऊत,राहुल खुणे,प्रतीक स्वामी,किरण शिंदे,नारायण भाळशंकर,गोरख उघडे,जीवन डोंगरे,धोंडीराम रामुळे,राजेंद्र सातपुते,सय्यद अयुब,किरण माने,सुमेध घाडगे,शंकर पवार,गोविंद पवार, नितीन पुटवाड,शेख मतीन,बळीराम घनघाव,लव्हाळे सर ता.सल्लागार राजकुमार सोनवणे,कृष्णा हौसरमल,नागनाथ पडलवार, अविनाश येळबकर आदी पदाधिकारी,सदस्यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

cmyk

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
सोमवार दि. २८ जुलै २०२५
४

# मराठवाड्यात उपयुक्त पाणीसाठा ५२ टक्क्यांवर!

## पावसाची प्रतिक्षा मात्र तज्ज्ञांकडून मोठ्या पावसाचा अंदाज

संभाजीनगर : मराठवाड्यातील ८७९ लघू, मध्यम, मोठ्या प्रकल्पांसह गोदावरी, तेरणा, मांजरा, रेणा नद्यांवरील बंधाऱ्यांमध्ये उपयुक्त पाणी साठा ५२ टक्क्यांवर पोहोचला असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली. मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पात ६४.१२ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. तर मध्यम ७५ प्रकल्पात ३२.४९ टक्के, लघू ७५१ प्रकल्पांत २७.५९ टक्के, गोदावरी नदीवरील १५ बंधाऱ्यांत ४१.७१ टक्के, तर तेरणा, मांजरा, रेणा नद्यांवरील २७ बंधाऱ्यांत सुमारे ४४.१२ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे.

मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पांपैकी जायकवाडीत ७८ टक्के, येलदरीत ६२ टक्के, सिद्धेश्वरमध्ये ३४ टक्के, माजलगावमध्ये १३ टक्के, मांजरामध्ये २५ टक्के, ऊर्ध्व पैनगंगा ६४ टक्के, निम्न तेरणा ७० टक्के, निम्नमनार ५३ टक्के, विष्णुपुरी ८२ टक्के, निम्न दुधना ४९ टक्के, तर सिनाकोळेगाव प्रकल्पात ५२ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. मध्यम ७५ प्रकल्पांपैकी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १६ प्रकल्पांत १८ टक्के, जालनामधील



७ प्रकल्पांत १७ टक्के, बीडमधील १६ प्रकल्पांत ५३ टक्के, लातूर मधील ८ प्रकल्पांत १६ टक्के, धाराशिवमधील १७ प्रकल्पांत ४३ टक्के, नांदेडमधील ९ प्रकल्पांत ४१ टक्के, परभणीतील २ प्रकल्पांत २८ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. मराठवाड्यातील ७५१ लघू प्रकल्पांपैकी संभाजीनगरमधील ९८ प्रकल्पांत १४ टक्के, जालनामधील ५७ प्रकल्पांत १७ टक्के, बीडमध्ये १२६ प्रकल्पांत ३३ टक्के, लातूरमधील १३५ प्रकल्पांत २१ टक्के, धाराशिवमधील २०६ प्रकल्पांत ४० टक्के, नांदेडमधील ८० प्रकल्पांत ३७ टक्के, परभणीतील २२ प्रकल्पांत १८ टक्के, तर

### १० लघू प्रकल्प अजूनही कोरडेच

मराठवाड्यातील १० लघू प्रकल्प अजूनही कोरडेच आहेत. त्यामध्ये जालन्यातील ५ व धाराशिवमधील ४ तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एका लघू प्रकल्पाचा समावेश आहे. तब्बल १६८ प्रकल्पांतील पाणीसाठा जोत्याखाली आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर, जालना जिल्ह्यातील प्रत्येकी १९, बीडमधील ३९, लातूरमधील १७, धाराशिवमधील ५५, नांदेडमधील २२, परभणीतील १२, हिंगोलीतील १५ लघू प्रकल्पांचा समावेश आहे. तर जोत्याखाली पाणीसाठा असलेल्या ५ मध्यम प्रकल्पांत बीडमधील २, तर जालना, छत्रपती संभाजीनगर व धाराशिवमधील प्रत्येकी एका मध्यम प्रकल्पाचा समावेश आहे.

हिंगोलीतील २७ प्रकल्पांत सर्वांत कमी सरासरी २ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे.

# ड्रॅगन फ्रूटची लागवड करा अन मिळवा मोठा नफा



सध्या भारतात ३,००० हेक्टर क्षेत्रात ड्रॅगन फ्रूटची लागवड केली जाते. त्याचे क्षेत्र वाढवून ५०,००० हेक्टर करण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले आहे. उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, ओडिशा आणि इतर अनेक राज्यांमध्ये या फळाची लागवड केली जात असून शेतकऱ्यांना मोठा नफा मिळत आहे. ड्रॅगन फ्रूट कापून आणि थेट बियांपासून रोपे तयार करून वाढवता येते. बियाण्यांपासून झाडे उगवल्यास, शेतकऱ्यांना फळांसाठी बराच वेळ प्रतीक्षा करावी लागू शकते. त्यामुळे कलमांपासून रोपे तयार करून व्यावसायिक पद्धतीने लागवड करावी, ज्यामुळे फळे लवकर येतील आणि शेतकऱ्यांना उत्पन्नही मिळत राहील.

लागवडीची पद्धत : ड्रॅगन फ्रूट कटिंग्जपासून रोपे तयार करण्यासाठी, कलमांची लांबी २० सेमी ठेवा आणि प्रथम कुंडीत लावा. कुंडी कोरडे शेण, वालुकामय माती आणि वाळूने भरा आणि सावलीच्या जागी ठेवा. कोरडे शेण, वालुकामय माती आणि वाळू यांचे प्रमाण अनुक्रमे १:१:२ ठेवा. ड्रॅगन फ्रूट हे उष्ण हवामानात घेतले जाणारे पीक आहे, ज्यासाठी किमान ५० सें.मी. पर्जन्यमान असलेले क्षेत्र आवश्यक आहे. ड्रॅगन फ्रूटच्या लागवडीसाठी २० अंश सेल्सिअस ते ३६ अंश सेल्सिअस तापमान सर्वात योग्य मानले जाते. झाडांच्या योग्य वाढीसाठी आणि चांगल्या उत्पादनासाठी, ते चमकदार आणि सनी भागात लावले पाहिजेत. तथापि, जास्त सूर्यप्रकाश आणि उष्णता या वनस्पतीसाठी योग्य नाही. ड्रॅगन फ्रूटचे साधारणपणे तीन प्रकार भारतात घेतले जातात. या जातींची फळे आणि त्यांच्या बियांच्या रंग आणि आकारानुसार विभागणी केली जाते. १. पांढरा प्रकार, २. लाल गुलाबी प्रकार, ३. पिवळा प्रकार

पांढऱ्या जातीच्या ड्रॅगन फ्रूट प्लांटचे फळ आतून पांढरे असते, ज्यामध्ये लहान काळ्या बिया असतात. ड्रॅगन फ्रूटची ही जात बाजारात कमी किमतीत विकली जाते. २. ड्रॅगन फ्रूटच्या लाल-गुलाबी जातीचे फळ आतून गुलाबी रंगाचे असते. हे चवीला खूपच चांगले आहे आणि पांढऱ्या जातीपेक्षा महाग विकले जाते. ३. ड्रॅगन फ्रूटच्या पिवळ्या जातीमध्ये, जेव्हा झाडांना फळे येतात तेव्हा त्यांचा रंग बाहेरून पिवळा असतो. त्याच वेळी, आतील लगदा पांढरा आहे. दोन्ही प्रकारांपेक्षा ते चवीला चांगले असून दोन्हीपेक्षा जास्त किमतीत विकले जाते.

# जगातील सर्वात लहान गायीच्या दूधात आहे औषधी गुणधर्म

पुंगनूर गाय ही मुख्यतः आंध्र प्रदेशमधील चित्तूर जिल्ह्यात आढळते. या गायीचे वैशिष्ट्ये म्हणजे ही गाय केवळ पाच किलो चाऱ्यासह दररोज तीन लिटर दूध देण्यास सक्षम आहे. अशा परिस्थितीत जगातील सर्वात लहान गाय म्हणून पुंगनूर गायची ओळख आहे.

भारतात गायींच्या अनेक उत्कृष्ट जाती आढळतात. देशात गायींच्या काही जाती आहेत ज्या हळूहळू नामशेष होत आहेत. गायींच्या नामशेष होणाऱ्या जातींमध्ये पुंगनूर गाय आहे. ही गाय जगातील सर्वात लहान गायींपैकी एक आहे. गायीची ही उत्कृष्ट जात दक्षिण भारतात विकसित करण्यात आली आहे. ही गाय नामशेष झाल्यामुळे आंध्र प्रदेशात मोठ्या प्रमाणावर तिच्या संवर्धनावर काम केले जात आहे, जेणेकरून तिला नामशेष होण्यापासून वाचवता येईल. पुंगनूर गाय ही मुख्यतः आंध्र प्रदेशमधील चित्तूर जिल्ह्यात आढळते.

या गायीचे वैशिष्ट्य म्हणजे ही गाय केवळ पाच किलो चाऱ्यासह दररोज तीन लिटर दूध देण्यास सक्षम आहे. अशा परिस्थितीत जगातील सर्वात लहान गाय म्हणून पुंगनूर गायची ओळख आहे. पुंगनूर गाय तिच्या लहान आकारासाठी प्रसिद्ध आहे.

पुंगनूर सर्वच बाजुने फायद्याची : पुंगनूर गायीची उंची जवळपास कुत्र्याएवढी असते.

म्हणजेच अडीच ते तीन फुट असते. पशुपालकांना ही गाय पाळणे खूप सोपे आहे. कारण तो चारा जास्त प्रमाणात खात नाही. ती एका दिवसात पाच किलो चारा खाते आणि तीन लिटर दूध देते. पुंगनूर गायीची जात सुमारे वर्षे जुनी मानली जाते. ही गाय देशातील जवळपास सर्वच राज्यात सहज पाळता येते.

पुंगनूर गाईचे दूध हे औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण : पुंगनूर गाईचे दूध हे औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. वास्तविक, त्याच्या दुधामध्ये सुमारे ८ टक्के फॅट असते, जे मानवी शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. त्याच वेळी, इतर गायींच्या दुधात ३ ते ३.३५ टक्के फॅटचे प्रमाण आढळते.

पुंगनूर गाय कशी ओळखावी : पुंगनूर गायीची उंची खूपच लहान असते. अशा स्थितीत या गायीचा मागचा भाग किंचित खाली झुकलेला असतो. याशिवाय या गायीची शिंगे वाकडी असून तिची पाठ पूर्णपणे सपाट असते. पुंगनूर गायींचा बहुतेक रंग पांढरा असतो.



# रुफ टॉप वॉटर हार्वेस्टिंग प्रणाली : व्यवस्थापन आणि देखभाल

**शहरीकरण आणि त्यातील पूर ही काही नवीन संकल्पना नाही. महाराष्ट्रामध्ये सन २००५ मध्ये आलेला पूर, चेन्नई मध्ये २०१५, पुणे व बेंगलोर मध्ये २०१९ ला असे अनेक पुर मोठ्या शहरांमध्ये दिसून येत आहेत. याला कारणीभूत म्हणजे वाढत्या शहरीकरणाबरोबर त्यातील ड्रेनेजची असलेली असुविधा आणि अयोग्य पाणी व्यवस्थापन. पाऊस पडल्यानंतर पाण्याला वाहून जाण्यासाठी वाट योग्य नसेल तर ते रस्त्यावर येऊन साठायला लागतो. हळूहळू मग तो मोठ्या पुराचे रूप धारण करते. ही अवस्था शहराकडील तर काही गावे पाण्यापासून वंचित आहेत पाण्याची असलेल्या कमतरतेमुळे दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होऊ लागला आहे. याला पाण्याचे असलेले अव्यवस्थापन हे तितकेच कारणीभूत आहे. या सर्वांना आळा घालण्यासाठी एक लक्षवेधी उपाय म्हणजे रेन वॉटर हार्वेस्टिंग. या तंत्रज्ञानामुळे आपल्याला पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन करता येते. पावसाचे पाणी वेगवेगळ्या पद्धतीने मार्गाने साठवता येते.**

छतावरील पाणी साठवणूक पद्धत : या मध्ये छतावर पडणाऱ्या पाण्याला एकत्र करून जमिनीमध्ये भूजल पुनर्भरणासाठी सोडता येते किंवा स्टोरेज टाकीमध्ये साठवून ते पुढील काळासाठी वापरता येऊ शकते.

भूजलाचा स्थर नियंत्रित करणे : शहरात येणाऱ्या पुराच्या पाण्याची तीव्रता व वारंवारिता कमी करण्यासाठी मदत होते. दुष्काळात पाण्याची उपलब्धता होण्यास मदत होते. भूजलातील पाण्याची पातळी व गुणवत्ता सुधारता येते. जल प्रदूषण रोखण्यास मदत होते. पाण्याची होत



असलेली कमी पूर्ण करता येते. पावसाळ्यात गटार व नाले ब्लॉक होऊन पूर येऊ नये याकरिता.

छत : घराचे छत हे वेगवेगळ्या प्रकारचे असते. त्यामध्ये प्रामुख्याने जीआय, , सिमेंट पत्रे, कौलारू तसेच मातीचे छत इत्यादींचा समावेश असतो. छतासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्यानुसार छतावरील पाण्याची उपलब्धता कमी जास्त होते. छतावरील पावसाच्या पाण्याचे संकलन करण्याकरता छत बिनविषारी पदार्थापासून बनविलेले असावे. त्याला वॉटरप्रूफिंग केलेले असावे.

गटर आणि प्रथम फ्लश डिव्हाइस : याचा वापर छतावरील पाणी साठवून खाली स्टोरेज टाकी पर्यंत खाली जाण्याचा पाईपने नेण्यासाठी करतात. ह्याला छता च्या काठावर सौम्य उतार देऊन बसवले जाते, जेणेकरून पाणी विना अडथळ्यांनी स्टोरेज टाकीपर्यंत जाईल. यासाठी - पाईप, किंवा बांबूचा वापर करतात. डाऊन पाईपचा व्यास कमीत कमी १०० मीमी आणि २० मेश ची जाळी असावी कारण झाडाची पाने किंवा लहान खड्डे आत जाऊन ब्लॉक होणार नाहीत. गटारची व्यास आणि रुंदी : १५ ७९७:२००८ च्या दिलेल्या निर्देशकावरून घ्यावा किंवा मानक सूत्रांवरून काढावा. हे उपक्रम हे सुनिश्चित करते की प्रथम पावसाचे आधी छतावर किंवा गटारीमध्ये कचरा किंवा धूळ जमा झाले असेल तर प्रथम पावसानंतर ते पावसाच्या पाण्यात मिसळून पाणी साठवून प्रणालीमध्ये जाऊ नये. म्हणून पहिले एक ते दोन पाऊस सर्व पाणी फ्लश करून हे डिवाइस बंद करतात जेणेकरून पुढील स्वच्छ पाणी साठवण टाकीमध्ये साठवता येते. पुनर्भरण खड्डा : पुनर्भरण खड्ड्याच्या संरचनेच्या घटका मध्ये गटार, प्रथम फ्लश डिव्हाइस आणि पुनर्भरण खड्डा हे घटक असतात. यामधील प्रथम तीन घटकांचा अभ्यास आपण वरील पुनर्वापर संकलन टाकी या संरचनेमध्ये पाहिला आहे. उर्वरित पुनर्भरण खड्याबद्दल माहिती खालील प्रमाणे पाहू. पुनर्भरण खड्ड्याचा आकार लांबी रुंदी उंची ही ३ ३ ३ घनमीटर मध्ये असावी. फिल्टर सामग्री मध्ये ०.६ मीटर, ०.५ मीटर, ०.४ मीटर मध्ये विभागणी करून मोठे दगड (५-१० सेमी) सर्वात खाली, खडी (५-१० मीमी) मध्यभागी आणि वाळू (१.५-२ मीमी) सर्वात वरती अनुक्रमे असावी. १.५ मीटरचा फ्री बोर्ड असावा. ( दिशादर्शक हरियाणा सरकार, २०२३). परंतु महाराष्ट्र सरकारच्या दिशादर्शकाच्या पद्धतीने पुनर्भर खड्ड्याचे लांबी व रुंदी ही एक ते दोन मीटर मध्ये तर उंची ही दोन ते तीन मीटर मध्ये असावे. तसेच मोठे दगड, खडकी आणि वाळू यांचे प्रमाण ५०%, २०%, १५% अशा अनुक्रमे असावे आणि फ्री बोर्ड पाच टक्के असावा. अशा प्रकारे जर दोन मीटरची उंची असेल तर त्यातील १.२ मीटर, ०.४ मीटर, ०.३ मीटर, ०.१ मीटर हे मोठे दगड, खडकी, वाळू आणि फ्री बोर्ड असेल.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७६१ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव हे मराठा साम्राज्यातील ४ थे पेशवे बनले.
१८६६ : आयर्लंडच्या व्हॅलेन्शिया द्वीपापासून कॅनडातील ट्रिनिटी बेपर्यंत समुद्राखालील तार घालण्याचे काम पूर्ण. युरोप अमेरिकेच्या दरम्यान तारसंदेश पाठवणे शक्य झाले.
१८९० : डच चित्रकार व्हिन्सेंट व्हॅन गॉगने स्वत:वर गोळी झाडुन घेतली. दोन दिवसांनी त्याचे निधन झाले.
१८९७ : बाळ गंगाधर टिळक यांना पहिल्यांदा कैद करण्यात आलं.
१९२१ : रक्तातील साखरेवर 'इन्सुलिन' या संप्रेरकाचे नियंत्रण असते असे टोरांटो विद्यापीठातील सर फ्रेड्रिक बँटिंग आणि चार्ल्स बेस्ट यांनी सिद्ध केले. तसेच त्यांनी 'इन्सुलिन' शुद्ध स्वरुपात विभक्त करण्यात यश मिळवले.
१९४० : ॲनिमेट शॉर्ट फिल्म ए जंगली हेअर मधून बग्स बनी हे पात्र प्रकाशित झाले.
१९४९ : पहिल्या प्रवासी जेट विमान, डी हॅविललँड कॉमेटचे पहिले उड्डाण.
१९५५ : दोस्त राष्ट्रांनी ऑस्ट्रियातुन आपले सैन्य काढुन घेतले.
१९८३ : कोलंबो येथील वेलिकाडा तुरुंगात सिंहली कैद्यांनी १८ तामिळ राजकीय कैद्यांची हत्या केली.
१९८७ : पुरातत्व विभागाच्या संशोधकांना टायटॅनिक जहाजाचा मलबा सापडला.
१९९७ : तामिळनाडुचे मुख्यमंत्री आणि द्रमुकचे अध्यक्ष एम. करुणानिधी यांची सलग सातव्यांदा पक्षाच्या अध्यक्षपदी निवड झाली. हा एक विक्रम आहे.
१९९९ : द्रवखनिज तेलवायूचा वाहनांसाठी इंधन म्हणून वापर करण्याचा प्रस्ताव पेट्रोलिअम मंत्रालयाने मंजूर केला.
२००१ : सार्वजनिक ठिकाणे, शासकीय इमारती, सार्वजनिक वाहने या ठिकाणी सिगारेट, तंबाखू, गुटखा सेवनावर व थुंकण्यावर तसेच या वस्तूंची सार्वजनिक ठिकाणी जाहिरात करण्यावर बंदी घालण्याचा महाराष्ट्र मंत्रीमंडळाचा निर्णय
२०१२ : लंडन येथे ३० व्या येथे ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६६७ : योहान बर्नोली स्विस गणितज्ञ (मृत्यू: १ जानेवारी १७४८)
१७२४ : राजस्थान मधील मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रतापसिंह द्वितीय यांचा जन्मदिन.
१८९९ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू पर्सी हॉर्नी ब्रूक यांचा जन्म.
१९११ : डॉ. पांडुरंग वासुदेव तथा पां. वा. सुखात्मे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संख्याशास्त्रज्ञ व आहारतज्ञ, पद्मभूषण (१९७१) (मृत्यू: २८ जानेवारी १९९७)
१९१३ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या कार्यकर्त्या कल्पना दत्त यांचा जन्मदिन.
१९१५ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू जॅक आयव्हरसन यांचा जन्म.
१९४० : भारतीय वंशीय अमेरिकन लेखिका व कादंबरीकार भारती मुखर्जी यांचा जन्मदिन.
१९५० : ग्रामी पुरस्कार सन्मानित उत्कृष्ट हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत वीणा वादक व्ही. एम. भट्ट यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी जी.एस. बाली यांचा जन्म.
१९५५ : ॲलन बॉर्डर ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
१९६३ : पाकिस्तानी क्रिकेट खेळाडू नवेद अंजुम यांचा जन्म.
१९६७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक राहुल बोस यांचा जन्म.
१९६९ : दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघातील माजी क्रिकेटपटू व मुंबई इंडियन संघाचे प्रशिक्षक जोंटी रोड्स यांचा जन्मदिन.
१९८३ : भारतीय फुटबॉल खेळाडू सॉकर वेल्हो यांचा जन्म.
१९९० : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री कृती सॅनॉन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४४ : जॉन डाल्टन इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ६ सप्टेंबर १७६६)
१८९५ : उस्ताद बंदे अली खाँ बीनकार, किराणा घराण्याचे प्रवर्तक, सूक्ष्म स्वरांचे भान असणारे व मधुर वादन करणारे असा त्यांचा लौकिक होता. पुण्यात नव्या पुलाजवळील दर्ग्याच्या परिसरात उस्ताद बंदे अली खाँ यांची कबर आहे. (जन्म: )
१९३५ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे निधन.
१९७५ : त्र्यं. र. ऊर्फ मामासाहेब देवगिरीकर गांधीवादी नेते, खासदार. भारतीय राज्यघटनेचे मराठीत भाषांतर करुन २६ जानेवारी १९५० रोजीच ते वाचकांच्या हातात देण्याचे काम त्यांनी केले. (जन्म:)
१९८० : मोहम्मद रझा पेहलवी इराण देशाचे शेवटचे शासक व शाह ऑफ इराण म्हणून प्रसिद्ध (जन्म: २६ आक्टोबर १९१९)
१९९२ : अमजद खान हिन्दी चित्रपटसृष्टीतील नावाजलेले खलनायक (जन्म: १२ नोव्हेंबर १९४० गझनी, अफगाणिस्तान)
१९९७ : बळवंत लक्ष्मण वष्ट हिंदुत्त्ववादी कार्यकर्ते
२००२ : कृष्णकांत भारताचे १० वे उपराष्ट्रपती (जन्म: २८ फेब्रुवारी १९२७)
२००७ : वामन दत्तात्रय पटवर्धन स्फोटके व शस्त्रास्त्र तज्ञ (जन्म: ३० जानेवारी १९१७)
२०१५ : भारताचे ११ वे राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे निधन. (जन्म: १५ ऑक्टोबर १९३१). भारतीय सर्वोत्कृष्ट पुरस्कार भारतरत्न, तसचं, पद्मभूषण व पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित "मिसाईल मॅन" म्हणून प्रसिद्ध भारतीय वैज्ञानिक व माजी भारतीय राष्ट्रपती

# ग्राहकांच्या विश्वासामुळेच गजानन बँकेची प्रगतीकडे वाटचाल -जयदत्त क्षीरसागर

नेकनूर । प्रतिनिधी

श्री गजानन नागरी सहकारी बँकेने प्रत्येक ग्राहकांचा विश्वास सांभाळून बँकेत नियमाप्रमाणेच पारदर्शक व्यवहार करण्याचे सूत्र अवलंबले आहे ग्राहकांच्या विश्वासामुळेच गजानन बँकेने प्रगती कडे वाटचाल केली असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. श्री.गजानन नागरी सहकारी बँकेच्या नेकनुर शाखेच्या वतीने दि.२६ रोजी नेकनुरच्या बाजारपेठेत एटीएम सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर ह.भ.प.लक्ष्मण महाराज मेंगडे आणि मान्यवरांच्या हस्ते एटीएम सेवेचा शुभारंभ करण्यात आला यावेळी दिनकर कदम, विलास बडगे,अरुण डाके, माधवराव मोराळे, पांडुरंग होमकर, नानासाहेब काकडे, तानाजी कदम, अरुण गोरे, बाबुशेठ लोढा, सचिन शिंदे, गणपत डोईफोडे, अर्जुन बहिरवाळ, सुभाष क्षीरसागर, दादासाहेब मुंडे, सुग्रीव रसाळ, हत्तुलाला, अच्युत मोरे, सेवानंद कदम, सखाराम मस्के, अभिमान शिंदे, सखाहरी गदळे, सुधाकर मिसाळ आदी उपस्थित होते




प्रारंभी स्व. काकू-नाना यांच्या प्रतिमेचे पूजन करून एटीएम विभागात हित कापून शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिनकर कदम दत्तात्रय, डोईफोडे यांनी केले तर यावेळी बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे व संचालक मंडळाच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, सर्वांच्या विश्वासास पात्र ठरलेली गजानन बँक आज पुढचे पाऊल टाकत आहे एटीएम सेवा सुरू करून ग्राहकांना सुविधा उपलब्ध करून देत आहे याही पुढे जाऊन लवकरच फोन पे ची सेवा देखील सुरू करण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. यावर्षी बऱ्यापैकी पावसाला सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही चांगली बाब आहे. गेल्या आठ वर्षापासून नेकनूर येथे बँकेची शाखा सुरू आहे. चौसाळा येथे देखील बँकेचा उत्तम प्रकारे व्यवहार सुरू आहे. लक्ष्मी आणि सरस्वती दोन्ही उत्तम राहिल्या तरच रोजचा गाडा पुढे रेटला जातो.आतापर्यंतच्या प्रवासात आपण सर्वजण साक्षीदार आहात. बालाघाटावर पाण्याची समस्या होती. विजेची समस्या होती यासाठी आपण नेटाने प्रयत्न करून या भागात साठवण तलाव, बंधारे आधी करून घेतले वीज केंद्राची उभारणी देखील या भागात झाल्यामुळे आज त्याचा फायदा होऊ लागला आहे. दीर्घकालीन कामाचे नियोजन केले तर वर्षानुवर्षे त्याचा उपयोग होतो.सेवाभाव ठेवून काम केले तर त्याचा जनतेलाच फायदा होतो.सध्या वाद मोठे झाले आहेत आणि संवाद कुठेच दिसत नाही. जातीयवादाचे स्टोन वाढले आहे त्यामुळे रोजच्या व्यवहारात देखील याचे परिणाम दिसू लागले आहे. तंत्रज्ञान कुठल्या कुठे पोहोचत आहे याचा अभ्यास केला तर कळेल आता तर एआय तंत्रज्ञान आले आहे वेगाने दिवसाचा बदल दिसत आहे आणि याच धरतीवर बँकेने देखील नव्या आव्हानाला सामोरे जात बदल स्वीकारले आहेत. ग्राहकांना अधिकाधिक सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न बँकेचा राहिला असून सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करून बँकेची वाटचाल सुरू आहे. ग्राहकांचा घामाचा, कष्टाचा पैसा असतो तो विश्वासाने सांभाळावा लागतो. बँकेने प्रत्येक ग्राहकांचा विश्वास सांभाळला जाईल, नियमाप्रमाणेच बँकेचा व्यवहार यापुढे देखील सुरू राहील. आतापर्यंतच्या बँकेच्या प्रवासात ग्राहकांचा विश्वास संपादन केल्यामुळेच बँकेने प्रगती कडे वाटचाल केली असल्याचे ते म्हणाले. यावेळी आभार संचालक राजेश तांगडे यांनी मानले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँकेचे कार्यकारी अधिकारी महादेव क्षीरसागर सरव्यवस्थापक शेख मंजूर बँकेचे व्यवस्थापक विलास कुंबेफळकर, शाखा व्यवस्थापक रवींद्र कुलकर्णी आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी अरुण बोंगाणे,सुधाकर कल्याणकर, नवनाथ कुलकर्णी, समाधान वंजारे, विठ्ठल वंजारे, महादेव खोसे,शेख मसीयुद्दीन, अमर पाशा, खाजा पाशा, तुषार घुमरे, महेंद्र फुटाणे, काझी जफर, शरद ढाकणे, दिलीप शेळके यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्रीराम जाधव यांनी केले.

## शाहीन अकॅडमीकडून समाजात शैक्षणिक क्रांती घडवण्याचा प्रयत्न - डॉ. अब्दुल कदीर



बीड । प्रतिनिधी

शहरातील हॉटेल गोल्डन चॉइस, बार्शी रोड, बीड येथे शाहीन अकॅडमीकडून अल्मा फातिमा सह इतर नीट मधील गुणवंतांचा सन्मान सोहळा थाटात साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन चे संस्थापक अध्यक्ष डॉ. अब्दुल क़दीर यांनी म्हटले की, शाहीन अकॅडमीच्या माध्यमातून समाजात शैक्षणिक क्रांती घडवायची आहे. यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनी पालक वर्ग शिक्षक शिक्षिका आणि समाज धोरणांचे अमूल्य सहकार्य अपेक्षित आहे. या सत्कार व मार्गदर्शन सोहळ्यात बीड शहरातील लेखक ख्यातनाम सूत्रसंचालक आणि शिक्षक असलेले अब्दुल रहीम उर्फ गुलाम साकिब लिखित पैगंबर मुहम्मद मुस्तफा सल्लल्लाहू अलैही व सल्लम यांच्यावर आधारित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा ही पार पडला.

यावेळी शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनचे संस्थापक अध्यक्ष आणि शैक्षणिक मार्गदर्शक डॉ. अब्दुल क़दीर यांनी समाजातील अज्ञानी रुढींवर अनावश्यक खर्च करण्याऐवजी त्या खर्चाचा उपयोग आपल्या मुलामुलींच्या शिक्षणावर केला पाहिजे. लग्नसमारंभात लाखो-कोटी रुपये खर्च करणाऱ्या समाजाने सर्वप्रथम लग्नाच्या जेवणाचा बहिष्कार करावा. साध्या सरळ पद्धतीने लग्न लावावे. या कार्यक्रमात डॉ. अब्दुल क़दीर यांच्या हस्ते अब्दुल रहीम उर्फ गुलाम साकिब लिखित ''सीरत मुहम्मद मुस्तफा सल्लल्लाहु अलैही व सल्लम'' या पुस्तकाचे प्रकाशन जिल्हा अभियंता, अबकारी विभाग बीडचे इंजि. अब्दुल हमीद खान यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना इंजि. अब्दुल हमीद खान यांनी म्हटले की, आजच्या काळात सीरतवर आधारित पुस्तके वाचणे आणि ती नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे फारच गरजेचे झाले आहे.

तसेच शाहीन अकॅडमीच्या माध्यमातून डॉ. अब्दुल क़दीर यांनी समाजाला शैक्षणिक मागासलेपणातून बाहेर काढण्याचा फार मोठा प्रयत्न केला आहे. बीडमधील शाहीन अकॅडमीत मुलींना सुरक्षित आणि उत्कृष्ट प्रशिक्षणाचे वातावरण मिळत आहे. या कार्यक्रमात शेख रफिक तांबोळी, अकील अहमद, असलम अनवरी, काज़ी शफिउद्दीन, डॉ. सफी अनवरी, मुज्तबा अहेमद खान, मौलाना साबिर रशीदी, अ‍ॅड. शेख शफीक भाऊ, प्राचार्य सिद्दीकी नवीद, परभणीचे नजीम भाई, पत्रकार अदनान खान, डॉ. मुबारक, मुक्तपत्रकार एस.एम. युसूफ़, शुजाअत देशमुख, जावेद बागबान, शाहिद खान, अनवर पाशा, सूफियान मनियार, समीर शेख, फहमीद खान, शफीक फारूकी, आसिफ ज़मां, सय्यद असद, इंजि. इम्रान बागबान आदींची उपस्थिती होती.

शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनचे बीड शाखा प्रमुख प्राचार्य डॉ. इम्रान मुनीर खान यांचे डॉ. अब्दुल क़दीर यांनी विशेष अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. अजित कुमार यादव, डॉ. जुबैर, फहीम, शेख जुनैद, रेहाना बाजी आणि सेविका खाला यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन गुलाम साकिब, लिजा खान आणि अल्फिया पठाण यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. इम्रान खान यांनी केले. अशा प्रकारे विद्यार्थी व पालकांचे सत्कार आणि मार्गदर्शन हा कार्यक्रम संपन्न झाला.

## शेतकऱ्याला नुसकान भरपाई देण्याचा आदेश

### राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचा आदेश

बीड। प्रतिनिधी

सन २०१८ मध्ये शिरूर कासार तालुक्यातील मौजे उकीर्डा गावातील शेतकऱ्याने त्यांच्या शेतामध्ये डेनिम प्रंच ७०९ बीटी २ या कापूस पिकाची लागवड केली होती परंतु कापूस लागवड करूनही वेळेत कापसाला पाते लागले नाही व बोंडे लागलेलं नाही त्यामुळे शेतकरी यांनी गयाबाई पानसंबळ व तात्यासाहेब पानसंबळ यांनी तालुका समितीकडे तक्रार दाखल केली होती परंतु सदर तक्रारीची कोणतीही दखल बियाणे कंपनीने घेतली नाही त्यामुळे तक्रार निवारण आयोग शेतकरी यांनी नुसकान भरपाईची मागणी केली होती त्यावर सुनावणी होऊन मा. राज्य आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार / शेतकरी यांना प्रवर्धन सीड्स या बियाणे कंपनीने रक्कम रुपये १,८०,०००/- झालेल्या पिकाच्या नुसकान भरपाईपोटी ८ टक्के व्याजासह देण्याचा आदेश पारित केला.

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील शेतकरी गयाबाई पानसंबळ व तात्यासाहेब पानसंबळ यांनी सन २०१७-२०१८ या हंगामा मध्ये त्यांच्या शेतात प्रवर्धन सीड्स या कंपनीच्या कापूस बियाणाची लागवड केली होती लागवड करूनही काही दिवस होऊनही वेळेत कापूस पिकला पाते व बोंडे लागले न्हवते व त्यामुळे शेतकऱ्याला उत्पन्न मिळाले नाही त्यामुळे तक्रारदार शेतकरी यांनी तालुका तक्रार निवारण समिती यांच्याकडे तक्रार दाखल केली होती त्या तक्रारीची दाखल घेऊन समितीने प्रवर्धन सीड्स या कंपनीचे बियाणे निकृष्ट असल्याचा अहवाल दिला होता परंतु त्यानंतर प्रवर्धन सीड्स या कंपनीने नुसकानग्रस्त शेतकऱ्याला नुसकान देण्यास टाळाटाळ केली होती त्यामुळे शेतकऱ्याने मा. जिल्हा आयोगाकडे दाद मागितली होती त्यावर सुनावणी होऊन नुसकन भरपाई देण्याचा आदेश पारित केला होता परंतु मा. आयोच्या आदेशाच्या नाराजीने प्रवर्धन सीड्स यांनी मा. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग औरंगाबाद यांच्याकडे आपील क्र. १५५१/२०१९ दाखल केले होते सदर प्रकरणात मा. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग औरंगाबाद यांच्यापुढे नुसकान ग्रस्त शेतकरी यांच्या बाजूने अ‍ॅड. अतुल बी. हावळे व योगेश के. बोबडे यांनी मा. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग औरंगाबाद यांच्या समोर शेतकऱ्यांच्या बाजूने बाजू मांडून नमूद केले कि, शेतकऱ्यांने लागवड केलेल्या पिकातून निकृष्ट दर्जाच्या बियाणामुळे जे नुसकान झालेले आहे त्यास तेमिळणे गरजेचे आहे या सर्व बाबींचा युक्तिवाद ग्रहीत धरून मा. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग औरंगाबाद यांनी तक्रारदार / शेतकरी यांना प्रवर्धन सीड्स या बियाणे कंपनीने रक्कम रुपये १,८०,०००/- झालेल्या पिकाच्या नुसकान भरपाईपोटी ८ टक्के व्याजासह देण्याचा आदेश पारित केला. सदर प्रकरणात कापूस उत्पादक शेतकरी गयाबाई पानसंबळ व तात्यासाहेब पानसंबळ यांनी अ‍ॅड. अतुल बी. हावळे व योगेश के. बोबडे काम पहिले व त्यास अनंता काळे यांनी सहकार्य केले तसेच प्रवर्धन सीड्स मार्फत प्रतिनिधी सुनावणी साठी हजर होते

## कारगिल युद्ध विजय स्मृतिदिनी शहिदांना अभिवादन

बीड

नापाक इराद्याने भारत भूमीवर आक्रमण केल्यामुळे पाकिस्तान विरुद्ध १९९९ साली कारगिल युद्ध करावे लागले व त्यात भारताने विजय प्राप्त केला. आपल्या भारत भूमीचे रक्षण करण्याकरिता अनेक जवान शहीद झाले.त्यांच्या पावन स्मृतीस कारगिल युद्धाच्या विजयी स्मृतिदिनी महामानव अभिवादन ग्रुपने महामानव महिला नागरी सहकारी पतपेढी धानोरा रोड बीड येथे शहिदांना भावपूर्ण विनम्र अभिवादन करून त्या युद्धात सहभागी असलेले कॅप्टन राजाभाऊ आठवले यांचा सत्कार संपन्न केला.

कार्यक्रमाचे अध्यक्षपदी से नी जिल्हा प्रबंधक (एलआयसी )यु. एस.वाघमारे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वासनिक यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रशांत वासनिक उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले की भारतीय सीमेवर तैनात असलेली सैनिक रात्रनदिवस सतर्क राहून आपले शीर तळहातावर घेऊन सीमेचे व आपल्या नागरी जीवनाचे संरक्षण करीत असतात. त्यात त्यांना काही वेळा वीर मरण देखील पत्करावे लागते. त्यांच्या ह्या असीम त्यागाचे आपण सर्वच नेहमी कृतज्ञ असावयास पाहिजे. देशाचे संरक्षण करताना, '' मी प्रथम भारतीय आहे आणि अंतिमतः भारतीय,'' हि राष्ट्र संकल्पना मनात पक्की रुजवून प्राणपणाला लावून सीमा रक्षण करीत असतात. सत्काराला उत्तर देताना कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी सांगितले की उंच



बर्फाळ दरी डोंगरात सैनिकांना कशा कशा प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागते हे वर्णन चित्रफीत दाखवल्याप्रमाणे उपस्थितांसमोर युद्धचे चित्र उभे केले तेव्हा त्यांनी वर्णन केलेल्या परिस्थितीच्या कल्पनेनेच अंगावर काटे उभे राहिले व प्रत्येकाच्या हृदयाचा ठोका चुकतो की काय असे वाटले. अध्यक्षीय समारोपात अध्यक्ष महोदय यांनी नौदल,भूदल व वायुदल मधील सैनिक देश रक्षणाकरिता २४ तास कसे सतर्क असतात हे सांगून नागरी जीवन जगत असताना राजकीय मतभेद कितीही असले तरी *देश प्रथम* यालाच प्रथम प्राधान्य देऊन सर्वांनी गुण्यागोविंदाने राहून आप आपल्या परीने कार्य करून देश सेवा कशी घडेल याची काळजी घेणे सर्वांच्या हिताची आहे हे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम.राऊत यांनी केले तर प्रास्ताविक महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष आयु जी.एम.भोले यांनी केले कार्यक्रमास डी जी वानखेडे,अ‍ॅड तेजस वडमारे,काशिनाथ वाघमारे,बी.डी.तांगडे व बहुसंख्य सदस्य उपस्थित होते.

## १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

### सांगा आम्हाला 'माझी शाळा सुंदर शाळा' म्हणायचं तरी कसं?;वांगी येथील विद्यार्थ्यांचा सवाल

बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वांगी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना '' माझी शाळा सुंदर शाळा'' म्हणायचं तरी कसं अशा प्रश्न पडला आहे.कारण भेगा पडलेल्या भिंती,गळके पत्रे आणि पावसाळ्यात दररोज शिक्षक आणि विद्यार्थ्यांना अगोदर झाडु आणि सुपली हातात घेऊन वर्गात साचलेले पाणी वर्गाबाहेर काढावे लागते. त्यामुळे केवळ रंगरंगोटी करुन शाळेच्या भिंतीवर ''माझी शाळा सुंदर शाळा'' लिहिल्याने आनंददायी शिक्षण मिळणार आहे का?? बीड जिल्ह्यातील मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतींच्या दुरुस्तीसाठी व नविन इमारत बांधकामासाठी निधी देण्यात यावा याकडे अजितदादा पवार पालकमंत्री,लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी यांचे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली १५ आगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येणार आहे.

वांगी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची स्थापना १९५३ ची असुन वर्ग पहिली ते सातवी




पर्यंत असलेल्या शाळेत १०५ विद्यार्थी पटसंख्या आहे. १० वर्गखोल्या असुन ६ शिक्षक कार्यरत असुन २ पदे रिक्त आहेत. शाळेच्या दुरावस्थेविषयी शिक्षण विभागाला लेखी कळवले असुन जिल्हा नियोजन मधुन निधी मंजूर होताच निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे वरिष्ठ स्तरावरून कळवले असल्याचे प्रभारी मुख्याध्यापक धन्वे निरंजन यांनी सांगितले. पत्रे ठिकठिकाणी गळके असल्याने पावसाळ्यात वर्गात पाणी साचते. वर्गात आल्या बरोबर झाडु आणि सुपली हातात घेऊन वर्गात साचलेले पाणी बाहेर काढावे लागते. भेगा पडलेल्या भिंती अशा धोकादायक वातावरणात आनंददायी शिक्षण कसं होणार? असा उद्विग्न प्रश्न शाळेतील शिक्षिका तारा चव्हाण यांनी उपस्थित केला आहे. वांगी येथील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या दुरावस्थेबाबत सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ शेळके यांनी २-३ वेळा आंदोलने केली. मात्र दुरूस्तीच्या नावाखाली बाह्य रंगरंगोटी केली जाते. जाधव वस्ती,कोलगुडे वस्ती, शेलार वस्ती,कोटुळे वस्ती,बजगुडे वस्ती येथील २-३ किलोमीटर वाड्या वसत्यावरून शिक्षणासाठी आलेल्या गोरगरिबांच्या लेकरांच्या शिक्षणाचे शासन आणि लोकप्रतिनिधींना सोयरसुतक नसल्याची संतप्त प्रतिक्रिया हरिभाऊ शेळके यांनी दिली.

बीड जिल्ह्यातील ३८१ शाळांमध्ये ६०७ वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक आहे.शिक्षण विभागाने यासाठी १४ कोटी ८५ लाख रुपयांचा प्रस्ताव नियोजन समितीकडे दिला असुन ग्रामीण भागातील शेतकरी, ऊसतोड मजुर, गोरगरिबांच्या लेकरांचे शिक्षण जीव मुठीत घेऊन धोकादायक ईमारतीमधुन होत असुन पालकमंत्री अजितदादा पवार यांनी नियोजन समितीच्या निधीतुन १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी यासाठी १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्रशासनाला दिले आहे.

## ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांना परळीत प्रतिसाद

परळी

पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथास रुद्राअभिषेक, श्री शनैश्वर मंदिरात महाआरती, बुध्दविहारात बुद्धवंदना, शहावली दर्ग्याला चादर, रुग्णांना फळ वाटप, शहर स्वच्छता कर्मचारी महिलांचा सन्मान, विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे ड्रेस वाटप, गोशाळा येथे चारा वाटप आदी सामाजिक कार्यक्रम घेऊन शहर भाजपाने आज ना. पंक जाताई मुंडे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. धुंवाधार पावसात झालेल्या या सर्व कार्यक्रमांना उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध धार्मिक स्थळे, शाळा, महाविद्यालये आणि ठिकठकाणी भरगच्च कार्यक्रम घेण्यात आले. माझा वाढदिवस समाजोपयोगी कार्यक्रमांनी साजरा करावा, बॅनर-पोस्टरबाजी करू नये'' असे आवाहन पर्यावरण हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले होते. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शहर भाजपाच्या वतीने शहरात गेल्या






पंधरा दिवसापासून ''वृक्ष लागवड पंधरवाडा'' चालू आहे. तर २१ ते २६ जुलै या दरम्यान सामाजिक सेवा उपक्रम सप्ताह राबविण्यात आला. आज या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात आले. आज ना. पंकजाताई मुंडे यांना शुभेच्छा देण्यासाठी सकाळी सर्व कार्यकर्त्यांनी बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथ रुद्राभिषेक केला. वैद्यनाथ मंदिराच्या जवळच असलेल्या श्री शनेश्वर मंदिर महाआरती करण्यात आली. श्रीराम मंदिर (बालाजी मंदिर) मध्ये असलेल्या अन्नपूर्णा देवीस कुलभूषण जैन यांनी सपत्नीक आरती केली. बंगला गल्ली येथे हुसेन शहावली दर्गा येथे चादर चढवल्यानंतर भीमनगर येथील बुद्धविहारात बुद्ध वंदना झाली. उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रमांतर्गत शहरातील वैद्यनाथ विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना गणवेशाचे आणि शालेय साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टी होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून वैद्यनाथ बँकेचे अध्यक्ष विनोद सामत, बँकेचे संचालक अनिल तांदळे, माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, जेष्ठ नेते शेख अब्दुल करीम, महादेव इटके, बाळासाहेब कराळे आदी उपस्थित होते. दरम्यान ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालयात रूग्णांना फळवाटप करण्यात आले.

शहरामध्ये स्वच्छतेचे अतिशय महत्वाचे काम करणाऱ्या पण कायम दुर्लक्षीत असलेल्या स्वच्छता दूत म्हणून भूमिका निभावणाऱ्या स्वच्छाता कर्मचारी महिलांचा सन्मान करून ना..पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयात वाढदिवस साजरा करण्यात आला. स्वच्छता महिला कर्मचाऱ्यांना सन्मानाने साडी-चोळी दिली. यावेळी पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचेही यावेळी वितरण करण्यात आले. या सर्व कार्यक्रमांना भाजपाचे माजी नगराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद शेठ सामत, भाजपाचे युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, माजी नगराध्यक्ष वैजनाथ जगतकर, भाजपाचे जेष्ठ माऊली दादा आघाव, विजय वाकेकर, केशव माळी, संदीप लाहोटी, अनिल तांदळे, डॉक्टर शालिनीताई कराड, बाळासाहेब कराळे, राजेंद्र ओझा, अब्दुल करीम, महादेव इटके, उमेश खाडे, प्रा. पवन मुंडे, मोहन जोशी, अश्विन मोगरकर, प्रितेश तोतला, सचिन गीते, अरुण पाठक, विकास हलगे, नरसिंग शिरसाट, पवन मोदानी, प्रशांत कराड, योगेश पांडकर, सुशील हरंगुळे, किशोर केंद्रे, ज्ञानोबा सुरवसे, बंडू नाना कोरे, नितीन समशेट्टी,अच्युत जोगदंड, राहुल घोबाळे, दीपक जगतकर, श्रीपाद शिंदे, राजेश कोलवार, दिलीप नेहरकर, विजयकुमार खोसे, बाळू फुले, उमेश निळे, विजय बुंदुले, शेख अनिस, शेख खदिर, शमी शेख, अनिस कुरेशी, मुंजा फुके, श्रीनिवास राऊत, प्रल्हाद सुरवसे, नरेश पिंपळे, मिलिंद कांबळे, रवी वाघमारे, विराज गीते, अनिश अग्रवाल तसेच महिला आघाडीच्या चंदाताई ठोंबरे, सारिका कुरील, वर्षा जोशी, शैलजा आदोडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र
सोमवार, दि.२८ जुलै २०२५ | ६

# अंबाजोगाई तालुक्यात संततधार पावसाने दाणादाण

## काही गावांचा संपर्क तुटला; रस्ते जलमय, नागरिकांची गैरसोय



अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून अधूनमधून पडणाऱ्या पावसानंतर शुक्रवारी रात्रीपासून पावसाने जोर धरला असून, शनिवारीही दिवसभर संततधार पावसाने हजेरी लावली. या मुसळधार पावसामुळे एकीकडे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, तर दुसरीकडे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

तालुक्यासह जिल्ह्याच्या इतर भागांमध्येही जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. अंबाजोगाई, धारूर, वडवणी, बीड, परळी, केज या भागात मध्यम ते जोरदार पाऊस सुरू आहे. पावसामुळे पिकांना पोषक वातावरण तयार झाले असून, जलसाठ्यांमध्येही वाढ झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. मात्र या पावसामुळे अनेक सखल भाग जलमय झाले असून, अनेक रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे वाहतुकीचा खोळंबा झाला आहे. अंबाजोगाई – मुडेगाव रस्त्यावरील पुलावर पाणी आल्याने काही गावांचा संपर्क मुख्य रस्त्यांशी तुटलेला आहे. नाल्यांना पाणी आल्याने काही पुल ओलांडणे धोकादायक बनले आहे. शहर व ग्रामीण भागातील खड्डेमय रस्त्यांमुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. विद्यार्थ्यांपासून नोकरदारांपर्यंत सर्वसामान्य नागरिकांना या स्थितीचा फटका बसत आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवस पावसाचा जोर असाच राहण्याचा अंदाज वर्तवला असून, परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पाटोदा नगरपंचायत सफाई कर्मचाऱ्यांचे दोन महिन्यांपासून वेतन रोखले, आंदोलनाचा इशारा

**पाटोदा । प्रतिनिधी**

नगरपंचायतीच्या सफाई विभागातील कर्मचाऱ्यांनी दोन महिन्यापासून वेतन असल्याने काम बंदचे हत्यार उपसले आहे सफाई कर्मचाऱ्यांनी आंदोलन पुकारल्याने शहरात दुर्गंधी वाढून आजार पसरण्याची भीती आहे या कर्मचाऱ्यांना नगरपंचायतीकडून कधीही वेळेवर वेतन दिले जात नाही काम बंद हत्यार उपसल्या नंतर पगार केले जात असल्याचा नियमित भाग झाला आहे कंत्राटी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनाही कंत्राटदार वेळेवर पगार देत नाही शिवाय घंटागाड्यांना वेळेत आणि पुरेशी इंधन न दिल्याने कंत्राट द्वारे होणाऱ्या स्वच्छतेच्या कामामध्ये अनिमित्त असते नगरपंचायत मध्ये मानधनी तत्त्वावरील कर्मचाऱ्यांकडून आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शहराची स्वच्छता व नाले सफाई चे काम केले जाते मानधनितत्त्वावरील कर्मचारी शहरातील झाड लोटीचे आणि बाजार स्वच्छतेचे काम करतात तर कंत्राट दराकडे घंटागाडी द्वारे काम केलेल्या कर्मचाऱ्यांचे शहरातील नालेसफाई चे काम आहे मानधनी स्वरूपाच्या मोबदल्यात काम करणारे सुमारे १७ कर्मचारी आहेत यामध्ये महिलांचा मोठा भरणा आहे तंत्रात दराकडे चार घंटा गाड्या दोन ट्रॅक्टर आणि सुमारे दहा कर्मचारी आहेत कंत्राट एका संस्थेच्या नावाने तीन नगरसेवकाकडे आहे त्यानंतर आपण वाहनांना पुरेशी इंधन दिले जात नसले घंटागाड्या वेळच्यावेळी शहरात फिरत नाहीत ट्रॅक्टर द्वारे जमा केलेल्या कचऱ्याच्या गाड्यावरील मजुरांनाही वेळेवर पगार दिला जात नाही अशा तक्रारी आहेत स्वच्छतेचे काम करणारे अ नगरपंचायत कर्मचारी आणि कंत्रात दाराकडील कर्मचाऱ्यांना वेळेवर मोबदला दिला जात नसल्याने ते काम बंद आंदोलन करतात आणि त्यानंतर प्रशासन पंतप्रधान जाग येते थोडेफार रक्कम देऊन पुन्हा काम करण्याची विनंती नगरपंचायत च्या मुख्याधिकाऱ्यास आणि तंत्रक दरास करावी लागते मग कर्मचारी कसे निषेचे काम करतात हा त्यांचा उपक्रम झाला आहे पण त्रदार नगरसेवक आणि नगरपंचायत च्या बेफिक्रीमुळे शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो.

# भाजपाच्या वतीने सामाजिक व धार्मिक उपक्रमांनी मंत्री पंकजा मुंडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



माजलगाव । प्रतिनिधी

येथील भाजपाच्या वतीने दिनांक २६ जुलै शनिवार रोजी सकाळी ०७:०० पासून ते सायंकाळी ७:०० वाजेपर्यंत विविध सात उपक्रमानी ना.पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस सामाजिक धार्मिक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

दि २६ जुलै शनिवार रोजी सकाळी सिद्धेश्वर मंदिर येथे वेद शास्त्र संपन्न ब्रह्म वृद्धांच्या मंत्रोच्चारामध्ये पंकजाताई मुंडेंना उत्तम आरोग्य उदंड आयुष्य लाभावे व त्यांच्या हातून अशीच अविरत सेवा कार्य घडत राहावे व त्यांची उत्तरोत्तर प्रगती व्हावी असा संकल्प करून पूजा करून आरती करून अभिष्टचिंतनाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.सकाळी ०९:०० वाजता माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी,कीट्टी आडगाव

◀◀ पान ३ वर

# लालबुंद निखाऱ्यावरून अनवाणी चालत नवसपूर्ती करणाऱ्या शेकडो भाविकांची गर्दी

**आष्टी । प्रतिनिधी)**

बजरंगबली की जय, समर्थ हनुमान महाराज की जय, जय जय श्रीराम, हर हर महादेव अशा जयघोषांनी श्रीक्षेत्र हनुमान टाकळी नगरी (ता.पाथर्डी)भक्तिभावाने दुमदुमून गेली. रहाड यात्रेत लालबुंद निखाऱ्यावरून अनवाणी चालत नवसपूर्ती करणाऱ्या शहरी व ग्रामीण भागातील शेकडो आबालवृद्धांनी आपल्या भक्तीचा अनोखा प्रत्यय दिला.आषाढ वद्य पंचमीच्या मुहलालबुंद निखाऱ्यावरून अनवाणी चालत नवसपूर्ती करणाऱ्या शेकडो भाविकांची गर्दीर्तावर श्रीक्षेत्र हनुमान टाकळी येथे पारंपरिक आणि वैशिष्ट्यपूर्ण अशा रहाड यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळपासूनच परिसरात भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊ लागली. दुपारी तीन वाजेपर्यंत राज्याच्या

कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांची विक्रमी उपस्थिती नोंदवली गेली.दुपारी जलसंपदा विभागाचे सेवानिवृत्त अभियंता अशोक खेडकर यांच्या हस्ते अग्निपुजन करून मान देण्यात आला तर वृद्धेश्वर कारखान्याचे संचालक सुभाष ताठे व देवस्थान अध्यक्ष रमेशआप्पा महाराज यांच्या उपस्थितीत अग्निपूजन करण्यात आले. बोरीच्या लाकडांचा विस्तव प्रज्वलित करण्यात आला.आष्टी तालुक्यातील धामणगाव येथिल यात्रेतील मानकरी बाबासाहेब लोखंडे

◀◀ पान ३ वर



# बीडमधील सराईत गुन्हेगार सोहेल खानची हसूर्ल कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी

जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी आणखी एक आरोपीवर एम पी डी ए कायदे अंतर्गत कारवाई केली आहे. बीड शहरातील भाजी मंडई भागात राहणारा कुख्यात गुंड सोहेल खान समद खान (वय २७) याच्यावर कारवाई करून त्याची छत्रपती संभाजी नगर येथील हरसुल जेलमध्ये रवानगी केली आहे.





पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी जिल्ह्यात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी हा कारवाईचा बडगा चालूच ठेवला आहे. बीड शहरातील जुनी भाजी मंडई भागात राहणारा सोहेल खान समद खान हा शहरातील भाजी मंडई, बशीरगंज, सुभाष रोड, बलभीम चौक, कारंजा ,राजुरी वेस, आदी भागात दादागिरी करून लोकांना त्रास देत होता. त्याच्यावर आतापर्यंत जवळपास सात गुन्हे दाखल झालेले आहेत. हे सर्व गुन्हे गंभीर स्वरूपाचे असल्याने त्याला एक नोटीस देण्यात आली होती. मात्र या नोटिशीला त्याने दाद दिली नाही.

दिनांक २६ जुलै रोजी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी बीड शहर आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने पकडून त्याची हरसुल जेलमध्ये रवानगी करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ, सपोनि बाबा राठोड,पो.ह. सचिन अलगट, महादेव दराडे ,गणपती राऊत ,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सिद्धेश्वर मुरकुटे, अभिमन्यू अऔताडे, युनूस बागवान, अश्फाक सय्यद, मनोज परजणे,बिबीसेन चव्हाण आदींनी केली. या कारवाईमुळे गुंडांवर दहशत बसेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या उपविभागीय कार्यालयाचे उद्घाटन



बीड । प्रतिनिधी

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचा अधिकाधिक लाभ, पात्र लाभार्थ्यांना व्हावा या उद्देशाने बीड शहरामध्ये महामंडळाच्या मराठवाड्यातील उपविभागीय कार्यालयाचे आज मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.

याप्रसंगी महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, श्रीक्षेत्र नारायणगडचे महंत शिवाजी महाराज, धनंजय देशमुख आदी उपस्थित

◀◀ पान ३ वर

# गंगावाडी खून प्रकरणातील आरोपीची बीड कारागृहात रवानगी

तलवाडा । प्रतिनिधी

प्रेम प्रकारातून शिवम चिकने यांना पाच जणांनी मिळून मारहाण केली होती. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्या नंतर तलवाडा पोलिसात गुन्हाच गुन्हा नोंद करण्यात आला यातील पाचही आरोपी तलवाडा पोलिसांनी पकडले त्यांना रविवार रोजी गेवराई

येथील न्यायालयासमोर उभे केले असता कोटनि त्यांची बीड कारागृहात रवानगी केली.गेवराई तालुक्यातील गंगावाडी येथील शिवम चिकने या तरुणास गावातीलच एका तरुणी सोबत प्रेम संबंध असल्याचा संशय घेऊन मुलीचे बडील, भाऊ यांच्यासह इतर तीन मुख्य आरोपी यांनी बेदम मारहाण केली होती, मारहाणी नंतर शिवम यास प्रथम गेवराई येथील व तेथून जेजे रुग्णालयात छत्रपती संभाजी नगर याठिकाणी उपचारासाठी नेण्यात आले होते, परंतु मारहाण मोठ्या प्रमाणात झाली असल्याने उपचारादरम्यान शिवम चिकाने यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी तलवाडा पोलिस ठाण्यात अगोदर मारहाणीचा तर मृत्यू झाल्यानंतर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता या पाच आरोपी पैकी सुरुवातीला तीन आरोपी पकडण्यात पोलिसांना यश आले होते व नंतर दोन आरोपी पकडण्यात आले या आरोपींना न्यायालयासमोर हजार केल्या नंतर त्यांना प्रथम पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. दरम्यान आरोपीची कसून चौकशी करून यामध्ये अजून कोणाचा सहभाग आहे का याचा तपास पोलिस करत असून दिनांक २७ जुलै रोजी या आरोपींना न्यायालयासमोर हजार केले असता न्यायालयाने या पाच हि आरोपींची कारागृहात रवानगी केली आहे. याप्रकरणी अधिक तपास सपोनी मनोज निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय स्वप्नील कोळी, उपनिरीक्षक कैलास अन्नादास, बिट अंमलदार काकडे हे करत आहेत.

# अंभोरा पोलीसांनी गुन्हेगारीवर बसविला आळा



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस स्टेशन हे कायमच नवनविन उपक्रमातुन आपल्यासमोर येत आहे अंभोरा पोलीस ठाण्याचे सपोनि प्रभारी मंगेश साळवे यांनी चार्ज घेतल्यापासून जणू अंभोरा अंतर्गत असणाऱ्या एकुण ८४ गावांमध्ये एक वेगळीच दहशत निर्माण होऊन अवैध धंद्यांना आळा बसल्याचे दिसून येते अन्? यामुळेच या सर्व कामाची दखल घेऊन बीड पोलिस अधीक्षक नवनीत कावंत()यांनी या पोलिस ठाण्याचा कौतुकास्पद गुणगौरव सुद्धा केला आहे, गेल्या सहा महिन्यांत अंभोरा पोलीस ठाण्याचे सपोनि प्रभारी मंगेश साळवे व त्यांचे सर्व सहकारी यांनी मिळून अवैध धंद्यात एक जणू विक्रम केला आहे

दारू चे ७६ गुन्हे ९ लाखापेक्षा अधिक मुद्देमाल जप्त

गांजा ३ गुन्हे १५ लाखापेक्षा अधिक मुद्देमाल जप्त

गुटखा १ गुन्हा दाखल १५ हजार चा मुद्देमाल जप्त जुगार २ गुन्हे १० हजारापेक्षा अधिक मुद्देमाल जप्त वाहतुकीचे नियम मोडणारे वाहना विरूद्ध कारवाई करून ४ लोकांपेक्षा अधिक दंड आकारण्यात आला दारू पिऊन वाहन चालवणाऱ्या विरूद्ध १५ केसेस गावोगावी शाळेत जाऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, चोऱ्या होऊ नयेत म्हणून सतत जनजागृती पर संदेश बैठका अंभोरा पोलिस घेत आहे महिलाविरुद्ध च्या गुन्ह्यात दोषारोप वेळेत पाठवीत आहेत.व सर्व जनतेस व विद्यार्थी वर्गांना वेळोवेळी मार्गदर्शन करुन जनजागृतीचे शाळा महाविद्यालयात असे विविध उपक्रम घेतल्याबद्दल अन्? गुन्हेगारीला योग्य त्या पद्धतीने योगे त्या वेळेस आळा बसवल्यामुळे अंभोरा पोलीस ठाण्याचे सपोनि मंगेश सांगळे व त्यांचे सर्व सहकारी यांचे पंचक्रोशीतुन तोंड भरून कौतुक होतं आहे.अंभोरा पोलीस ठाण्याचे सपोनि व सर्व सहकारी कर्मचाऱ्यांना कौतुकास्पद थाप बीड पोलिस अधीक्षक नवनीत कावंत यांनी मारत अंभोरा पोलिस ठाण्याचे कौतुक प्रमाणपत्र देऊन गुणगौरव देखील करण्यात आला.

# दिंद्रुड पोलिस ठाण्याचे युवराज श्रीडोळे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील उमरी येथील मुळे व शिंदेवाडी येथील गडदे यांचा शेतीचा वाद गेल्या दोन महिन्यांपासून सुरू होता. हा वाद गावातील प्रतिष्ठित, सामाजिक, राजकीय, पत्रकार लोकांनी थेट बांधावर जाऊनही मिटवू शकला नव्हता. मात्र, दिंद्रुड पोलिस ठाण्याचे श्रिडोळे यांनी बुधवार रोजी थेट बांधावर जाऊन दोन्ही शेतकऱ्यांना सामंजस्याने समजावत ''वाद नको'' म्हणून कोणावरही अन्याय न करता मुळे व गडदे यांचा वाद थेट बांधावरच मिटवला. त्यामुळे दोन्ही शेतकऱ्यांत समाधान निर्माण झाले असून, दिंद्रुड पोलिसांचे कौतुक होत आहे.



उमरी शिवारातील गट क्रमांक २२२ येथे कुंडलिक गीताराम मुळे यांची वडिलोपार्जित १० एकर जमीन होती. त्यातील ५ एकर जमीन पाटबंधारे विभागाने भूसंपादन केली होती. उर्वरित ५ एकर जमीन त्यांनी महादेव गडदे यांना विक्री केली होती. ही ५ एकर जमीन गडदे गेल्या २० वर्षांपासून कसत होते. मात्र, गडदे यांना आपल्याला जमीन कमी आहे असे वाटू लागल्याने त्यांनी शासकीय मोजणी फीस भरून जमीन मोजणी केली. मोजणी दरम्यान मुळे यांच्या भूसंपादित जमिनीतील थोडा भाग मोजणीत निघाल्याने वाद सुरू झाला.

कुंडलिक मुळे यांच्या पाच एकर जमिनीपैकी दोन एकर जमीन कॅनॉलच्या खोदकामात गेली, मात्र उर्वरित तीन एकर जमीन ते मूळ मालक म्हणून गेल्या दहा वर्षांपासून कसत होते. मात्र, भूसंपादित जमिनीवर गडदे यांनी ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे वाद निर्माण झाला. या वादाबाबत शिंदेवाडी, उमरी येथील प्रतिष्ठित, सामाजिक लोकांनी थेट बांधावर जाऊनही वाद मिटवण्याचा प्रयत्न केला, परंतु तो यशस्वी झाला नव्हता.


शेवटी कुंडलिक मुळे यांचे भाऊ राजेभाऊ मुळे यांनी ''माझ्या भूसंपादित जमिनीवर मूळ मालक या नात्याने मला ती जमीन कसता येते'' यासंदर्भात सांगितले. तसेच, ''मी त्या जमिनीवर कापूस लागवड केली होती, ती गडदे यांनी ट्रॅक्टरच्या साहाय्याने मोडून त्या ठिकाणी सोयाबीन पेरली व माझ्या पिकाचे नुकसान केले,'' अशी तक्रार दिंद्रुड पोलिस ठाण्यात दिली.

# ना.पंकजाताई मुंडे हे नाव महाराष्ट्राच्या राजकारणात खंबीर आणि झुंजार नेतृत्वाचं प्रतीक –संजय आंधळे

## वडवणीत शैक्षणिक,पर्यावरण सप्ताहाने मंत्री पंकजा मुंडेंचा वाढदिवस साजरा

वडवणी । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे हे नाव केवळ राजकारणापुरतं मर्यादित नाही, तर ते एक प्रेरणादायी नेतृत्व, संघर्षशील विचारसरणी आणि समाजकार्याच्या भक्कम आधाराचा प्रतीक आहे. त्यांचा वाढदिवस उपक्रमशीलतेने साजरा होणं, ही त्यांच्या कार्याचीच पुढची पायरी असल्याचे मत वडवणी तालुका भाजपचे नेते संजय आंधळे यांनी शैक्षणिक व पर्यावरण सप्ताहाच्या



प्रारंभ प्रसंगी मत व्यक्त केले भारतीय जनता पक्षाच्या नेत्या आणि राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी तालुक्यातील चिंचोटी, हरिश्चंद्र पिंपरी, हरिश्चंद्र पिंपरी तांडा, सोन्नाखोटा, खाडेवाडी, डोंगरेवाडी, जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण व शैक्षणिक साहित्य वाटप करून वाढदिवस सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. पुढील सात दिवस शैक्षणिक, पर्यावरण सप्ताह चालणार असून याचा प्रारंभ मोठ्या उत्साहाने करण्यात आला आहे. पुढे बोलताना भाजपचे नेते संजय आंधळे म्हणाले की,

ना. पंकजाताई मुंडे या एक प्रेरणादायी नेतृत्व, संघर्षशील विचारसरणी आणि समाजकार्याच्या भक्कम आधाराचे प्रतीक आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची हीच प्रेरणा घेऊन वडवणी तालुक्यात त्यांचा वाढदिवस सामाजिक भान जपणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात येत आहे. लोकनेते गोपीनाथराव

◀◀ पान ३ वर

# बर्दापूरात घरफोडी करणारे दोघे बीडमध्ये पकडले

बीड । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर परिसरातील गिरवली, जवळगाव, बर्दापूर अशा ठिकाणी चोऱ्या करून दागिने लंपास करणारे दोघेजण बीड मधील माने कॉम्प्लेक्स परिसरात पकडले. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने केली. पानगाव येथील रहिवासी असलेले शेख इरफान मुनीर ( २१ वर्ष) व मुस्तफा कासिम पठाण (वय २७ वर्षे) या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले.



जानेवारी महिन्यात बर्दापूर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत तीन ठिकाणी घर फोड्या झाल्या होत्या. तांत्रिक बाबीच्या आधारे आरोपींची नावे उघड झाली मात्र ते सापडत नव्हते. दिनांक २६ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गुप्तचरा मार्फत हे दोघे बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात थांबलेले असल्याची माहिती मिळाल्यावरून पोलीस निरीक्षक बंटेवाड यांनी या आरोपीला पकडण्यासाठी आपली टीम पाठवली. या टीमने या दोघांना ताब्यात घेतले. त्यांनी तीन ठिकाणी दरोडे टाकल्याचेही कबूल केले आहे. आरोपींना बर्दापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे .पुढील कारवाई बर्दापूर पोलीस ठाण्याचे सहपोनी ससाने हे करीत आहेत. या आरोपीकडून नांदेड परिसरातील गुन्हे,नांदेड ग्रामीणमध्ये एक गुन्हा, रेनापुर येथे एक गुन्हा, परळी येथे एक गुन्हा असे चोरीचे गुन्हे केल्याचे कबूल केले. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, स्थागुशाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि.सिद्धेश्वर मुरकुटे ,पो.ह. विकास राठोड, राहुल शिंदे, नितीन वडमारे, पोलीस अमलदार अशपाक सय्यद, मनोज परजणे ,नारायण कोरडे आदींनी केली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
सोमवार, दि.२८ जुलै २०२५ | पान ७

# पोलिसांनीच अमली पदार्थ प्लांट केले, हे राजकीय षडयंत्र

## प्रांजल खेवलकरांच्या प्रकरणाच्या सुनावणीत दोन्ही पक्षांचा जोरदार युक्तीवाद

**पुणे | प्रतिनिधी**

**पुणे पोलिसांनी खराडी येथील फ्लॅटवर टाकलेल्या धाडीत माजी मंत्री एकनाथ खडसे यांच्या जावयासह सात जणांवर कारवाई करण्यात आली. शनिवारी रात्री झालेल्या या कारवाईत पोलिसांनी कोकेन, गांजा, हुक्का, दारू या अमली पदार्थांसह काही साहित्यही जप्त केलं. यात माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर (झीरपक्षरश्र घहशुरश्रज्ञरी) यांना झालेल्या अटकेमुळे मोठी खळबळ उडाली असून राजकीय वर्तुळातून आरोप प्रत्यारोप होत आहेत. दरम्यान, या प्रकरणावर न्यायालयात आज झालेल्या सुनावणीत न्यायालयाने प्रांजल खेवलकरांसह सातही आरोपींना ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सरकारी वकिलांसह प्रांजल खेवलकर यांच्या वकिलांनी जोरदार युक्तीवाद केला. यात रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांच्यासह इतर पाचही आरोपींना पुढील तपासासाठी पोलीस कोठडी देण्यात यावी असा युक्तीवाद सरकारी वकिलांनी केला. तर आरोपी प्रांजल खेवलकर यांचे वकिल विजयसिंह ठोंबरे यांनी हे राजकीय षडयंत्र असून पोलिसांनीच अमली पदार्थ प्लांट केले असल्याचा युक्तीवाद केला.**

रविवारी पहाटे साडे तीन वाजण्याच्या सुमारास पुण्यातील खराडी भागातील स्टेबर्ड अझुर



सुट याठिकाणी गुन्हे शाखेने ही कारवाई केली. यात माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकर यांच्यासह दोन महिला व तीन पुरुषांना अटक करण्यात आली. यावेळी पुणे पोलिसांनी ४२ लाख रुपयांसह अंमली पदार्थ जप्त केले. खराडी पोलीस ठाण्यात या संदर्भात नडीपीएस. अ‍ॅक्ट कलम ८ (क), २२ (ब) (११) अ, २१ (ब), २७ कोटपा ७ (२), २० २) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निखिल पिंगळे, पोलिस उपआयुक्त (गुन्हे) यांनी या कारवाईची माहिती दिली. पुढील तपास सुरु असल्याचंही सांगण्यात आलं. दरम्यान, सर्व आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आलं. तपास अधिकारी वेळेत न पोहोचल्यानं न्यायाधीश चेंबरमध्ये निघून गेले. सुनावणी उशीरा सुरु करण्यात आली. दोन्ही पक्षांच्या युक्तीवादानंतर न्यायालयाने सातही आरोपींना ७ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पुणे पोलिसांनी केलेल्या कारवाईत पाच पुरुष व दोन महिलांना अटक करण्यात आली. प्रांजल मनिष खेवलकर(४१). निखिल जेठानंद पोपटाणी (३५). समीर फकीर महमंद सय्यद (४१). सचिन सोनाजी भोंबे (४२). श्रीपाद मोहन यादव (२७). ईशा देवज्योत सिंग (२२). प्राची गोपाल शर्मा (२२). अशी अटक करण्यात आलेल्या सात आरोपींची नावे असून यात निखिल पोपटानी, समिर सय्यद आणि एका महिलेला नशा करण्याची सवय असल्याचं सरकारी वकिलांनी नमूद केलं. सरकारी वकिलांनी या प्रकरणाची माहिती न्यायाधिशांना देताना ' रेव्ह पार्टी ' हा शब्द वापरला. मात्र न्यायाधिशांनी रेव्ह पार्टी हा शब्द वापरु नये असं म्हटलं. अटक केलेल्या आरोपींनी अंमली पदार्थ कुठुन आणले याचा तपास करायचा आहे. त्यासाठी आरोपींना पोलीस कोठडी मिळावी अशी मागणी सरकारी वकिलांनी न्यायालयात केली.सरकारी वकिलांनी सात दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली आहे.

### प्रांजल खेवलकर यांच्या वकिलांचा युक्तीवाद काय ?


माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या रोहिणी खडसे यांचे पती डॉ. प्रांजल खेवलकर यांच्यावर झालेली कारवाई ही राजकीय षडयंत्र असल्याचं वकिल विजयसिंह ठोंबरे यांनी न्यायालयात सांगितलं. आरोपींनी कोणत्याही अंमली पदार्थांचं सेवन केलं नव्हतं. पोलिसांनीच अंमली पदार्थ प्लांट केले असावेत. आमच्याकडे घटनेचे सीसीटीव्ही फुटेज आहेत. खेवलकर यांनी अंमली पदार्थांचे सेवन केलेले नाही किंवा ते जवळही बाळगले नसल्याचा युक्तीवाद आरोपीच्या वकिलांनी केला.

---

## मुलाला वाचवताना आईचाही जीव गेला; देवकरवाडीतील दुर्दैवी घटना!

राहू: ओढ्यात पडलेल्या मुलाला वाचविताना महिला व तिच्या मुलाचा मृत्यू झाला असल्याची धक्कादायक घटना देवकरवाडी (ता.दौड)येथील गणेशनगर शिवारात रविवारी (ता.२७) रोजी दुपारी एकच्या दरम्यान घडली. निर्मला अनिल दरेकर (वय ३०) हर्षद अनिल दरेकर (वय १० )असे संबंधित मायलेंकराचे नाव आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, गणेशनगर येथील स्वत:च्या शेतामध्ये संबंधित महिला उसाच्या शेतामध्ये मिरचीचे रोपे लावली. त्यानंतर बांधावर आंब्याचे कोय लावत असताना शेजारीच खेळत असलेल्या लहान हर्षदनेही



ओढ्याच्या कडेला झाड लावण्याचे अनुकरण करत होता. नकळत तो ओढ्याच्या पात्रात पडला. यानंतर काही मिनिटांतच आईच्या लक्षात आल्यावर तीनेही आरडाओरडा करत शोधाशोध केली असता मुलगा ओढ्याच्या पाण्यात पडल्याचे लक्षात आले. निर्मला यांनीही ओढ्यात जात मुलाला वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याही ओढ्यात वाहत गेल्या. निर्मला यांचा आरडाओरडाचा आवाज ऐकून काही वेळाने त्यांचे सासरे सोपान आले असता त्यांनी दोघांना पाण्यातून काढत राहु येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. पुढील उपचारासाठी यवत येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याबाबत यवत पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद देण्याचे काम सुरू असून यवत पोलीस अधिकचा तपास करत आहेत. या परीसरातील ओढ्याचे खोलीकरण केल्यामुळे ओढ्यात पाणी जास्त होते. राहू येथे सकाळी चिमुकल्याचा मृत्यू त्यानंतर गणेश नगर परिसरामध्ये माय लेकरांचा मृत्यू यामुळे परिसरामध्ये शोकाकुल वातावरण होते.

## राजगुरुनगर रोटरीतर्फे शैक्षणिक पचे वितरण

पिंपरी | प्रतिनिधी

पिंपरी बुद्रुकच्या श्री सुमंत माध्यमिक विद्यालयातील ५४ विद्यार्थ्यांना व सहा शिक्षकांना रोटरी क्लब ऑफ राजगुरुनगर यांच्या वतीने शैक्षणिक स्टडी पचे वितरण करण्यात आले. हा उपक्रम रोटरीचे अध्यक्ष राजन जांभळे यांच्या हस्ते व सुमंत संस्थेचे अध्यक्ष बाबाजी ठाकूर व सचिव कैलास ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला.

याप्रसंगी अध्यक्ष जांभळे म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला डिजिटल स्टडी पच्या माध्यमातून चालना देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेला उपक्रम उल्लेखनीय ठरत आहे. श्री सुमंत विद्यालयातील ई-लर्निंग लॅबमधे या पचा वापर करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी भागातील शाळांप्रमाणेच सर्व सुविधा पुरविण्याचा संस्था नेहमीच प्रयत्न करते. गेल्या वर्षी झालेल्या बोर्डाच्या परीक्षेत राजगुरुनगर येथील विद्यार्थिनी कनुप्रिया सांडभोर हिने याच सुविधांचा वापर करून दहावीच्या परीक्षेत १०० टक्के गुण मिळवून यश संपादन केले. त्यामुळे याचा तालुक्यातील विद्यार्थ्यांना निश्चितच फायदा होईल. विद्यार्थ्यांना विविध विषयांमध्ये सखोल मार्गदर्शन मिळावे, स्वयं-अध्ययन व सराव परीक्षांची तयारी करता यावी आणि एकूणच गुणवत्तेत वाढ व्हावी या उद्देशाने हे प विकसित केले आहे. याप्रसंगी मुख्याध्यापक शरद सोमवंशी यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## बारामतीत भीषण अपघात, ट्रकने दुचाकीला चिरडलं, वडिलांसह २ मुलींचा जागीच मृत्यू

पुणे जिल्ह्यातील बारामतीत काळजाला चटका लावणारी दुर्घटना घडली आहे. भरधाव ट्रकने दुचाकीला जोरात धडक दिली आणि फरपटत नेलं. यात तिघांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये वडील आणि त्यांच्या दोन अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. ही भीषण घटना बारामतीतील खंडोबानगर चौकात घडली. या घटनेमुळे संपूर्ण बारामती शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवर असलेले ओंकार राजेंद्र आचार्य (वडील) यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्या दोन मुली सई (वय ११) आणि मधुरा (वय ५) या दोघींनाही गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. पोलिस निरीक्षक विलास नाळे यांनी सांगितले की, ओंकार आचार्य आपल्या मुलींसोबत दुचाकीवरून खंडोबानगर चौकातून जात होते. इतक्यात भरधाव ट्रकने त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. आणि तिघंही ट्रकच्या चाकाखाली आले. घटनास्थळी हृदय पिळवटून टाकणारे दृश्य पाहून अनेकांचे डोळे पाणावले. या भीषण अपघातामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. पोलिसांनी त्वरीत घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले. अपघातानंतर काहीकाळ



वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. पोलिसांनी ट्रकचालकाला ताब्यात घेऊन या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला आहे. या अपघातामुळे आचार्य कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, नागरिकांनी खंडोबानगर चौकात योग्य वाहतूक नियंत्रणाची व्यवस्था करण्यात यावी, अशी जोरदार मागणी केली आहे.

---

## कंपनीची ८० लाखांची फसवणूक; कर्मचाऱ्यांवर दोषारोपपत्र दाखल

पुणे | प्रतिनिधी

ठरवून दिलेल्या कंपनीला मालाची विक्री न करता पदाचा गैरवापर करत 'सॉफ्टहार्ट ऑटोमेशन कंपनी प्रा. लि.'ची फसवणूक केल्याप्रकरणी सात आरोपींच्या विरोधात नुकतेच दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. आरोपींनी कंपनीची एकूण ८० लाख रुपयांची फसवणूक केल्याचे तपासातून स्पष्ट झाले आहे.

कंपनीच्या विक्री विभागातील माधव कल्याण जगताप (वय ३६), धनश्री माधव जगताप (वय ३३, दोघेही रा. जय शंकर अपार्टमेंट, आंबेगाव पठार), राहुल अनिल सुलाखे (रा. साई अंगण सोसायटी, इंद्रायणीनगर), प्रशांत जयराम जगताप (वय ३५, रा. गोकुळनगर, कात्रज), पूजा रोहित जगताप (वय ३४, रा. कात्रज-कोंढवा रस्ता), मीनाक्षी कदम आणि धर्मेंद्र रामचंद्र सुतार (वय ४७, रा. वाहगाव, कराड) यांच्यावर दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

याबाबत अशोक विठोबा वर्पे (वय ४७, रा. धनकवडी) यांनी सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माधव कल्याण जगताप व कंपनीचे यापूर्वीचे कामगार राहुल अनिल सुलाखे, पूजा जगताप, मीनाक्षी कदम व धर्मेंद्र सुतार यांनी त्यांच्या पदाचा व अधिकाराचा गैरवापर व आपसांत संगनमत केली. फिर्यादी कार्यरत असलेल्या कंपनीच्या मालाची एका नामांकित कंपनीला विक्री न करता अन्य कंपन्यांना परस्पर विक्री केली. त्यातून आलेले ३१ लाख ८४ हजार ७६९ रुपये कंपनीच्या खात्यावर न भरता माधव जगताप याने स्वतः, पत्नी धनश्री जगताप व मित्र प्रशांत जगताप यांच्या खात्यावर ती रक्कम जमा करून कंपनीची फसवणूक केली.गुन्हा दाखल झाला, तेव्हा कंपनीची ३१ लाख ८४ हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे नमूद करण्यात आले होते. पोलिसांनी केलेल्या तपासातून कंपनीची एकूण ८० लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या गुन्ह्याचा तपास सहकारनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुल गौड करत आहेत.

## श्रावणी यात्रेसाठी सोमेश्वर मंदिर सज्ज

सोमेश्वरनगर: श्रीक्षेत्र करंजे (ता. बारामती) येथील श्री सोमेश्वर मंदिरात पहिल्या श्रावणी सोमवारी (दि. २८) भरणार्या यात्रेची सोमेश्वर देवस्थान ट्रस्टने जय्यत तयारी केली आहे. सोमयाचे करंजे म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री सोमेश्वराच्या दर्शनासाठी राज्यभरातून भाविक येथे येतात.



समाधानकारक पावसामुळे यंदा भाविकांच्या गर्दीत वाढ होण्याची शक्यता आहे.

यात्रेनिमित्त मंदिर परिसराची साफसफाई करण्यात आली आहे. तसेच, मंदिराला आकर्षक रंगरंगोटी, विद्युतरोषणाई, पिण्याच्या पाण्याची सोय, पार्किंग आणि महाप्रसादाची सोय केली आहे. स्वयंभू श्री शिवलिंग दर्शनासाठी रांगेची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती देवस्थान समितीचे अध्यक्ष अनंता मोकाशी आणि सचिव विपुल भांडवलकर यांनी दिली. यात्रेनिमित्त मंदिर परिसरात खेळणी, मिठाई आणि इतर दुकाने लावण्यात येतात. श्रावणातील पवित्र महिन्यात भाविकांकडून मंदिरात होमहवन, पूजा पार पडते. भाविकांनी शिस्तीत दर्शन घेत देवस्थानला सहकार्य करावे, असे आवाहन विश्वस्त समितीने केले आहे.

पोलिस निरीक्षक सचिन काळे यांनी मंदिर परिसराची पाहणी करून सुरक्षेचा आढावा घेतला. भाविकांनी शिस्तीत दर्शन घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित केले आहेत.दर सोमवारी तसेच श्रावण महिन्यात दररोज सकाळी व संध्याकाळी मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. भाविकांसाठी भक्तनिवासाची सोय आहे. गर्दी टाळण्यासाठी मंदिरापासून काही अंतरावर पार्किंगची सोय केली आहे. तसेच पेढे, स्टेशनरी, हॉटेल, पाळणे या दुकानांच्या रांगा एकमेकांपासून दूर आणि स्वतंत्र असणार आहेत. बस सुविधेसाठी विविध आगारांना पत्रव्यवहार केला आहे. ट्रस्टकडून विहिरीला कुंपण करून घेतले असून, दर्शनरांगेत सुसूत्रता यावी व चोर्या होऊ नयेत म्हणून दर्शनबारी ओवरीच्या बाहेर आणली आहे.

## वरसगाव धरणातील पाणी पातळीत वाढ!

### ४१०४ क्युसेक विसर्ग सुरू, पाटबंधारे विभागाकडून नागरिकांना खबरदारीचे आवाहन

पुणे | प्रतिनिधी

राज्यात सर्वदूर जोरदार पाऊस सुरू आहे. मुंबईसह मराठवाडा आणि विदर्भात पावसाने अक्षरशः कहर केला आहे. अनेक नद्यांना पूर आला असून, जनजीवन पूर्णपणे विस्कळित झाले आहे. पुण्यातही पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. कधी विश्रांती अन् पुन्हा सुरूवात अशी पुण्यात पावसाची परिस्थिती आहे. जिल्ह्यातही पावसाचा जोर कायम आहे. यामुळे वरसगाव धरणातील पाणी पातळीत कमालीची वाढ झाली आहे.



२७ जुलै रोजी धरणाच्या पाणी पातळीमधील झपाट्याने होत असलेली वाढ व पाणलोट क्षेत्रामधील अतिपर्जन्यमानामुळे आज सकाळी ९ वाजता वरसगाव धरणामधून नदी पात्रामध्ये २२७२ क्युसेक विसर्ग वाढवून सांडव्याद्वारे ३५०४ क्युसेक करण्यात आला आहे. तसेच विद्युत निर्मिती केंद्राद्वारे ६०० क्युसेक एकूण ४१०४ क्युसेक विसर्ग करण्यात येणार आहे, अशी माहिती पाटबंधारे विभागाकडून देण्यात आली आहे. तसेच पावसाच्या प्रमाणानुसार विसर्ग पुन्हा कमी/जास्त करण्याची शक्यता आहे, असे देखील सांगण्यात आले आहे.

यामुळे नदीपात्रात उतरू नये, नदीपात्रात काही तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावीत, अशा सूचना संबंधित सखल भागातील नागरिकांना देण्यात आल्या आहेत, असे आवाहन मुठा कालवे पाटबंधारे उपविभागाचे मोहन शांतराम भदाणे उपविभागीय अभियंता यांनी केले आहे.

---

## पाताळगंगाने ओलांडली धोक्याची पातळी

खालापूर : तालुक्यातील खोपोली शहरासह परिसरात मुसळधार पावसाने हाहाकार माजवला आहे. सततच्या पावसामुळे पाताळगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून, अनेक भागांमध्ये पाणी साचल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता प्रशासनाने शुक्रवारी (दि. २५) सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली होती. हवामान विभागाने रायगड जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला आहे. त्या पार्श्वभूमीवर खोपोली, खालापूर आणि परिसरात मुसळधार पावसाचा जोर वाढत असून, अनेक ठिकाणी पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. खोपोली शहर घाटमाथ्याच्या पायथ्याशी असल्याने डोंगरांवरून वाहणारे लहान-मोठे धबधबे, झरे यांचे पाणी पाताळगंगा नदीत मिळत असल्याने पूराचा धोका अधिकच वाढला आहे.



जुना पुणे - मुंबई महामार्ग पुन्हा एकदा पाण्याखाली गेला असून, खोपोलीतील युनिमाऊंट सोसायटी परिसरात गुडघाभर पाणी साचल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. अनेक वाहने बंद पडली असून, वाहनचालकांना पर्यायी मार्गाचा वापर करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. एक लेन वाहतुकीसाठी बंद करण्यात आली आहे. कर्जत-खोपोली रेल्वेमार्गावर केळवली ते लौजी गाव दरम्यान रेल्वे रुळ पाण्याखाली गेल्याने रेल्वेगाड्या उशिराने धावत आहेत. त्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

खोपोली शहरातील लौजी, श्रीरामनगर, चिंचवली डिपी, शिळफाटा परिसरातील डीसी नगर येथे मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. रस्ते जलमय झाल्याने नागरिकांना घराबाहेर पडणे अशक्य झाले आहे. दरडधोक्याच्या सुभाषनगर वसाहतीमधील रहिवासी भीतीच्या छायेखाली आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ही दरड कोसळण्याच्या अवस्थेत असूनही त्यावर ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. सध्या हवामान खात्याने पुढील २४ तासांसाठीही मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे, त्यामुळे परिस्थितीवर प्रशासनाचे बारकाईने लक्ष असून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

पुलावरून ओसंडून वाहणारे पाणी

पाताळगंगा नदीवरील खालापूर-सावरोली जोड पुलावरून पाणी ओसंडून वाहत आहे, त्यामुळे पुलावरून ये-जा करणाऱ्यांची गैरसोय झाली आहे. काही नागरिक मात्र जीव धोक्यात घालून पुलावरून जाण्याचा प्रयत्न करत असल्याचे दृश्य दिसत आहे. त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून वाहतूक पोलिस आणि स्थानिक प्रशासन सतर्क आहे.

आपत्कालीन यंत्रणा तैनात

खालापूर तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सतत सुरू असलेल्या पावसामुळे प्रशासनाकडून आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. पूरग्रस्त भागांमध्ये मदत कार्य सुरू असून, नागरिकांनी आवश्यक असल्यासच घराबाहेर पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावं, स्थानिक प्रशासनाशी संपर्कात राहावं, आणि सुरक्षिततेचे सर्व नियम पाळावेत, असे आवाहन तहसील कार्यालय आणि पोलिस प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

## करडे कंपनी फसवणुक प्रकरणी जिल्हा सत्र न्यायालयाने बाप-लेकीचा जामीन फेटाळला

**शिरूर | प्रतिनिधी**

**शिरूर तालुक्यातील करडे येथील डब्ल्यू स्केअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत माजी सैनिकाची पत्नी रेश्मा राहुल वाळके (वय ३७) यांना बनावट कागदपत्रांद्वारे भागीदारीतून बेकायदेशीरपणे काढून टाकण्यात आले. या आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणी रेश्मा वाळके यांनी शिरूर पोलीस ठाण्यात २७ जानेवारी २०२५ रोजी चार जणांविरुद्ध तक्रार दाखल केली. जिल्हा सत्र न्यायालयात दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून संभाजी वाळके आणि त्यांची मुलगी प्रियांका वाळके यांचा जामीन फेटाळण्यात आला.**

रेश्मा वाळके यांनी पुणे ग्रामीणचे तत्कालीन पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर १९ मार्च २०२५ रोजी मुख्य आरोपी सचिन संभाजी वाळके याला अटक झाली. त्याला १० दिवसांची पोलीस कोठडी आणि २ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली. शिरूर न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला होता, परंतु संभाजी आणि प्रियांका वाळके यांचा जिल्हा सत्र न्यायालयातील जामीन अर्ज फेटाळला गेला.

आरोपींचा जामीन नामंजूर

या प्रकरणाचा तपास सुरुवातीला पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांच्याकडे होता, परंतु नंतर तो पोलीस उपनिरीक्षक सागर शेळके यांच्याकडे वर्ग करण्यात आला. दोन्ही अधिकाऱ्यांनी वरिष्ठांचा कोणताही दबाव न स्वीकारता सखोल तपास करून सत्य बाहेर आणले, ज्यामुळे त्यांचे कौतुक होत आहे.